POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२३८ ● मुंबई, बुधवार, ०१ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रात जनगणनेचा बिगुल वाजला! १६ मे पासून पहिल्या टप्प्याला सुरुवात

# देशात प्रथमच डिजिटल पद्धतीचा वापर

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

२०२७ च्या जनगणनेचे वेळापत्रक देशव्यापी जाहीर करण्यात आले आहे. महाराष्ट्रात जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडेल. स्व-गणना १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत केली जाईल. हा देशव्यापी जनगणना कार्यक्रम १६ एप्रिल २०२६ रोजी सुरू होईल आणि ३० सप्टेंबरपर्यंत चालेल. ही जनगणना प्रथमच डिजिटल पद्धतीने केली जात असून, प्रथमच स्व-गणनेचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. स्व-गणना ही एक सुरक्षित वेब-आधारित सुविधा आहे, ज्याद्वारे प्रतिसादक घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यापूर्वी १६ भाषांमध्ये आपली माहिती ऑनलाइन नोंदवू शकतात. या जनगणनेत डेटाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी सर्व आवश्यक तरतुदी करण्यात आल्या आहेत. देशभरात ३० लाखांहून अधिक गणक, पर्यवेक्षक आणि इतर अधिकारी २०२७ ची जनगणना पार पाडतील. गणक त्यांच्या स्मार्टफोनचा वापर करून एका मोबाईल ॲपद्वारे थेट डेटा गोळा करून सादर करतील.



भारताच्या भविष्यातील नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली 'जनगणना २०२७' आता प्रत्यक्षात सुरू होत आहे. या मोहिमेचा पहिला टप्पा, जो 'घरयादी व घरगणना' असा आहे, तो आगामी १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे. 'आपली जनगणना - आपला विकास' या संकल्पनेवर आधारित ही प्रक्रिया राबवण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. या पहिल्या टप्प्यात केवळ घरांची नोंदणी आणि घरांमध्ये उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. या टप्प्यात प्रगणक घरोघरी जाऊन घराला क्रमांक देणे, घराचे स्वरूप (कच्चे/पक्के), पिण्याचे पाणी, वीज, शौचालय आणि कुटुंबातील सदस्यांची प्राथमिक माहिती घेतील.

▸ **माहिती गोपनीय ठेवली जाणार :** 'सार्वजनिक कल्याणासाठी जनगणना' ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना घाबरून न जाता किंवा कोणतीही माहिती न लपवता वस्तुनिष्ठ माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दिलेली सर्व माहिती कायदेशीररीत्या गोपनीय ठेवली जाणार असून, तिचा वापर केवळ लोककल्याणाच्या योजना आखण्यासाठीच केला जाणार आहे. या सर्व प्रश्नांची उत्तरे कुटुंबप्रमुखाकडून गणनाकाराला दिली जातील. गणनाकार ही माहिती सुरक्षितपणे संग्रहित करेल. ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने पूर्ण केली जाईल.

▸ **कोव्हिड महामारीमुळे विलंब :** नियमानुसार, दर १० वर्षांनी जनगणना होणे अपेक्षित असते, त्यानुसार २०२१ मध्ये जनगणना होणे नियोजित होते. मात्र, कोविड-१९ महामारीच्या संकटामुळे ती पुढे ढकलण्यात आली. २०११ मध्ये झालेली जनगणना ही १५ वी राष्ट्रीय जनगणना होती. त्यावेळी झालेल्या जनगणनेत महाराष्ट्राची लोकसंख्या साधारणपणे ११.२४ कोटी इतकी नोंदवण्यात आली होती. २०२१ ची प्रलंबित जनगणना कोरोना महामारीनंतर विविध तांत्रिक आणि प्रशासकीय कारणांमुळे ही प्रक्रिया अजूनही पूर्ण झालेली नाही.

## पुढचे 5 दिवस धोक्याचे... अलर्ट जारी

# वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस राज्याला झोडपणार

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गेल्या दोन दिवसांपासून राज्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पुणे, नाशिक, धुळे, जळगावसह मराठवाडा आणि विदर्भातील काही भागात वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडला. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतमालाचे मोठे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी घरांचेही नुकसान झाले आहे. मात्र अजूनही राज्यावरील संकट टळलेले नाही. पुढील 5 दिवस राज्याच्या विविध भागात पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागाने काही जिल्ह्यांसाठी अलर्ट जारी केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**पुढील 5 दिवस धोक्याचे**

पुणे हवामान विभागाचे प्रमुख सुदीप कुमार यांनी सांगितले की, पुण्यासह राज्यात पुढचे पाच दिवस पावसाची शक्यता आहे. आजही वादळी वाऱ्यासह गारांचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही ठिकाणी ऑरेंज अलर्ट, तर काही ठिकाणी येलो अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाडा मध्य महाराष्ट्र विदर्भात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन**

पुढे बोलताना सुदीप कुमार यांनी सांगितले की, ह्यपुण्यासह राज्यभरात काल मुसळधार पाऊस पडला, तर काही भागात गारपीट तसेच काही ठिकाणी गारांचा पाऊस पडला आहे. त्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. आता पुढील पाच दिवस ही पावसाचे असणार आहेत. कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्याने दररोज दुपारनंतर पाऊस पडेल. 4 तारखेनंतर पावसाचा जोर कमी होऊ शकतो. गारांच्या पावसामुळे शेतीचे नुकसान होऊ शकते, त्यामुळे शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी. विजांच्या कडकडाट हा पाऊस होणारं असल्यानं शेतकऱ्यांनी मोकळ्या जागेत आणि झाडाखाली थांबू नये असं आवाहनही हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

**धाराशिव जिल्ह्यात वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान**

धाराशिव जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी वादळी वाऱ्यांसह मुसळधार पाऊस कोसळला. या वादळामुळे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. आंब्याची 50% फळे वादळामुळे गळून पडल्याने आंबा उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसला आहे. पुढील पाच दिवस धाराशिव जिल्ह्यात हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जारी केला आहे, त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत.



## जीवावर बेतलेला प्रवास... रेल्वे रुळात पडून प्रवाशाचा मृत्यू

■ **वसई। प्रतिनिधी,**

मीरा-भाईंदर परिसरातील सकाळच्या प्रचंड गर्दीत भाईंदर रेल्वे स्थानकावर एक दुर्दैवी घटना घडली. फलाट क्रमांक 1 वर रेल्वे पकडण्याच्या गडबडीत एका प्रवाशाचा रुळात पडून मृत्यू झाला, ज्यामुळे काही काळ रेल्वे वाहतूकही विस्कळीत झाली.

दररोजप्रमाणे आज सकाळीही मीरा-भाईंदर परिसरातून मोठ्या संख्येने नोकरदार मुंबईकडे प्रवासासाठी निघाले होते. सकाळच्या गर्दीच्या वेळेत भाईंदर रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी झाली होती. याच गर्दीत फलाट क्रमांक 1 वर एक प्रवासी रेल्वे पकडण्याच्या घाईत रुळात पडल्याची घटना घडली. घटनेनंतर स्थानकावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि रेल्वे कर्मचाऱ्यांनी तत्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला, मात्र संबंधित प्रवाशाचा जागीच मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. या अपघातामुळे काही वेळ रेल्वे सेवा ठप्प झाली होती. मृतदेह रुळावरून बाहेर काढल्यानंतरच रेल्वे वाहतूक पुन्हा सुरळीत करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांना काही काळ गैरसोयीचा सामना करावा लागला.

प्राथमिक माहितीनुसार, प्रचंड गर्दी आणि गडबडीमुळे हा अपघात घडल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अनेक प्रवासी चालू ट्रेनमध्ये चढण्याचा किंवा दरवाज्याला लटकून प्रवास करण्याचा धोका पत्करत असल्याने अशा घटना वारंवार घडत असल्याचेही समोर येत आहे. घटनेनंतर स्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी अधिक तपास सुरू असून, मृत व्यक्तीबबत अद्याप स्पष्ट माहिती मिळालेली नाही.



**महिन्याभरात मिरा रोड ते वैतरणा दरम्यान 28 जणांचा अपघातात मृत्यू**

पश्चिम रेल्वेवरील मीरा रोड ते वैतरणा या रेल्वे पट्यात गेल्या महिन्यात अपघातांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे दिसून आले आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, फेब्रुवारी 2026 या एकाच महिन्यात या क्षेत्रात रेल्वे अपघातात एकूण 28 जणांचा मृत्यू झाला आहे. या अपघातांमध्ये प्रामुख्याने रेल्वे रूळ ओलांडताना होणारे अपघात, चालत्या ट्रेनमधून पडणे आणि खांबाला धडक लागल्याने होणाऱ्या दुर्घटनांचा समावेश आहे. रेल्वे पोलिसआणि प्रशासनाकडून वारंवार सूचना देऊनही प्रवाशांकडून नियमांचे उल्लंघन होत असल्याने हे अपघात घडत आहेत. प्रवाशांनी सुरक्षिततेसाठी पादचारी पुलाचा वापर करावा आणि धावत्या ट्रेनमध्ये लटकून प्रवास करणे टाळावे, असे आवाहन रेल्वे प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठी खळबळ!

## एकावेळी 10 बड्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या... मंत्रलायातून जीआर निघाला



■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्राच्या प्रशासनात मोठी उलथापालथ झाली आहे. एकावेळी 10 बड्या आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या आहेत. मंत्रलायातून आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा जीआर निघाला आहे. तात्काळ या अधिकाऱ्यांना नवीन पदाचा पदभार स्विकारावा लागणार आहे. बदली झालेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांचे देखील नाव आहे. सरकारने 31 मार्च 2026 रोजी या बदलीचे आदेश दिले आहेत. बदली झालेल्या 10 अधिकाऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये तुकाराम मुंढे यांचंही नाव आहे. सनदी अधिकारी तुकाराम मुंढेंची दिव्यांग मंत्रालयातून बदली झाली आहे. 20 वर्षात मुंढेंची 24वी बदली आहे. मुंढे आता आपत्ती व्यवस्थापन विभागात आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सचिव म्हणून काम पाहणार आहेत. महसूल आणि वनविभागाचीही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.

**बदली झालेल्या 10 कअर अधिकाऱ्यांची यादी**

1 **लोकेश चंद्र (आयएएसःआरआरः1993),** अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि. यांची मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मुंबई येथे बदली करण्यात आली आहे.

2 **अश्विनी भिडे (आयएएसःआरआरः1995),** मुख्यमंत्री यांच्या अतिरिक्त मुख्य सचिव यांची महानगरपालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई येथे बदली करण्यात आली आहे.

3 **विकास चंद्र रस्तोगी (आयएएसःआरआरः1995),** अतिरिक्त मुख्य सचिव (कृषी), कृषी आणि एडीएफ विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई येथे बदली करण्यात आली आहे.

4 **विनिता वैद सिंघल (आयएएसःआरआरः1996),** प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन आणि पुनर्विकास, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची प्रधान सचिव म्हणून बदली करण्यात आली आहे. मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

5 **परिमल सिंग (आयएएसःआरआरः2004)** प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (ढडउफअ), मुंबई यांची सचिव (कृषी) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. कृषी आणि एडीएफ विभाग, मंत्रालय, मुंबई.

6 **तुकाराम मुंढे (आयएएसःआरआरः2005)** सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सचिव, आपत्ती व्यवस्थापन, फ&फ, महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे.

7 **लहू माळी (आयएएसःआरआरः2009)** यांची व्यवस्थापकीय संचालक, शिवशाही पुनर्वासन प्रकल्प लिमिटेड मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

8 **माणिक गुरसाल (आयएएसःआरआरः:2009)** यांना सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे.

9 **प्रेरणा देशभ्रतार (आयएएसःआरआरः2010)** सह आयुक्त, राज्य कर, मुंबई यांची आयुक्त, मत्स्यव्यवसाय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## सांगली हादरली...

# एकाच दिवसात तीन मर्डर, घटनेने उडाला थरकाप

■ **सांगली। प्रतिनिधी,**

सांगली जिल्ह्यात एकाच दिवसात तीन विविध घटना तीन जणांची हत्या झाल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. पहिल्या घटनेत सांगली शहरातील लक्ष्मी मंदिर येथे पाठलाग करून एका गुन्हेगाराची हत्या करण्यात आली आहे. दुसऱ्या भयानक घटनेत जत मधील वळसंग एका महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून आणि तिचे डोके दगडाने ठेचून खून करण्यात आला.तिसऱ्या घटनेत जतच्या बिळूर येथे सामायिक जमीन आणि विहिरीच्या वादातून श्रीधर येलगोंडा याचा हत्या करण्यात आली. या तीन घटनांमुळे सांगली जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. सांगली शहरातील लक्ष्मी मंदिर परिसरात एका गुन्हेगाराचा पाठलाग करुन अन्य गुन्हेगारांनी निर्घृन खून केल्याची धक्कादायक घटना घडली. सौरभ पवार असे या गुन्हेगाराचे नाव आहे. सांगली शहरातील मुख्य रस्त्यावर सोमवारी रात्री सौरभ पवार याचा थरारक पाठलाग करून त्याच्यावर धारदार हत्यारांनी हल्ला करण्यात आला. शाहिद मुल्ला आणि आयान भिस्ती या दोघांनी त्याचा खून केल्याचे उघडकीस आले आहे . दरम्यान या प्रकरणी शाहीद मुल्ला याला पोलिसांनी अटक केली आहे. मुख्य रस्त्यावर अशा प्रकारे एखाद्या चित्रपटात घडावी पाठलाग करून खून केल्याची घटना घडल्याने सांगली शहरात खळबळ उडाली आहे. दुसऱ्या घटनेत जत मधील वळसंग येथे एका महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून तसेच तिचे डोके दगडाने ठेचून तिचा खून करण्यात आल्याचे उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. वळसंग गावाजवळ भर दुपारी या ३० वर्षीय महिलेच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकण्यात आले आणि तिचे डोके दगडाने ठेचून तिची हत्या झाल्याने घबराट पसरली.

तिसऱ्या घटनेत जत मधील बिळूर येथे जमीन आणि सामायिक विहिरीच्या वादातून श्रीधर येलगोंडा यांचाही भर दिवसा खून करण्यात आला. यानंतर हल्लेखोर पसार झाले आहेत. दरम्यान सांगली जिल्ह्यात एकाच दिवसात तीन खुनांच्या घटना घडल्यामुळे मात्र एकच खळबळ उडाली आहे.

## सातान्यात चिता पेटवली अन् क्षणात...

# सरकारी रुग्णालयाच्या एका चुकीने भयंकर घडलं, संतापजनक प्रकार समोर!




■ **सातारा। प्रतिनिधी,**

मृत्यू हे अंतिम सत्य आहे, जन्माला आलेल्या प्रत्येकाचा मृत्यू अटळ आहे. एखाद्याच्या मृत्यूनंतर त्याच्यावर धार्मिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात येतात. अशातच आता सातान्यात अंत्यसंस्कार सुरू असताना एक धक्कादायक घटना घडली आहे. नातेवाईकांना पेटलेली चिता विझवावी लागली आहे. सरकारी रुग्णालयाच्या एका चुकीमुळे नातेवेईकांवर ही वेळ आली आहे. याचे कारण म्हणजे शासकीय रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे मृतदेहांची अदलाबदल झाल्यामुळे हे समोर आले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**शासकीय रुग्णालयात निष्काळजीपणाचा कळस**

सातान्यातील जिल्हा शासकीय रुग्णालयात निष्काळजीपणाचा कळस पाहायला मिळाला. मृत्यूनंतरही मृत शरीराची हेळसांड झाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. वाई तालुक्यातील सोनगरवाडी येथील 26 वर्षीय आनंद ओव्हाळ आणि आरळे येथील 51 वर्षीय सुरेश खोमणे या दोघांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. जिल्हा शासकीय रुग्णालय प्रशासनाने दोन्ही नातेवाईकांना चेहरा न दाखवता मृतदेह ताब्यात दिले आणि याच ठिकाणी मोठी चूक झाली.

**कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृतदेहांची अदलाबदल**

सातान्यातील शासकीय रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मृतदेहांची थेट अदलाबदल झाल्याचे समोर आले आहे. इतकंच नव्हे, तर एका कुटुंबाने चुकीच्या मृतदेहावर अंत्यसंस्कार केले. चिता पेटल्यानंतर हा धक्कादायक प्रकार उघडकीस आला, त्यामुळे पेटती चिता विझवण्याची वेळ नातेवाईकांवर आली. या घटनेमुळे कुटुंबीयांचा संताप अनावर झाला असून रुग्णालय प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.


## काळी जादू केल्याचा संशय,वृद्धाचे अपहरण करून बेदम मारहाण

■ **भाईंदर। प्रतिनिधी,**

विज्ञानाच्या युगातही अंधश्रद्धेचा विळखा किती घट्ट आहे, याची प्रचिती देणारी एक धक्कादायक घटना भाईंदरमध्ये घडली आहे. काळी जादू केल्याच्या संशयावरून एका ६२ वर्षीय वृद्धाचे अपहरण करून त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. यांप्रकरणी नवघर पोलिसांनी तातडीने तपास करत चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत, तर एक आरोपी अद्याप फरार आहे. भाईंदर पूर्वेतील हनुमाननगर परिसरात राहणारे ६२ वर्षीय सोलंकी यांच्यावर आरोपींनी काळी जादू केल्याचा संशय घेतला होता. याच रागातून आरोपींनी त्यांचे अपहरण केले. सोलंकी यांना जबरदस्तीने एका कारमध्ये बसवून अज्ञात स्थळी नेण्यात आले. अपहरण केल्यानंतर आरोपींनी सोलंकी यांना केवळ बेदम मारहाणच केली नाही, तर क्रूरतेची सीमा ओलांडली. त्यांच्या डोळ्यांत मिरचीची पूड टाकून त्यांना असहाय्य करण्यात आले. त्यांच्यावर चाकूने वार करण्यात आले, ज्यामध्ये ते गंभीर जखमी झाले. मारहाण केल्यानंतर मरणासन्न अवस्थेत असलेल्या सोलंकी यांना आरोपींनी नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर परिसरात नेऊन सोडून दिले आणि तिथून पळ काढला. कसाबसा आपला जीव वाचवून सोलंकी यांनी भाईंदर गाठले आणि नवघर पोलीस ठाण्यात घडलेली घटना सांगितली. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक



विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी काशिमीरा परिसरातून चार आरोपींना अटक केली आहे. चार आरोपींना ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून अधिक चौकशी सुरू आहे. या प्रकरणातील एका फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे भाईंदर परिसरात दहशतीचे वातावरण पसरले आहे. केवळ संशयावरून एका ज्येष्ठ नागरिकाला अशा प्रकारे अमानुष वागणूक दिली गेल्याने परिसरातून संताप व्यक्त केला जात आहे.



## अहिल्यानगरमध्ये तलावात 3 लहान मुले बुडाली

### एकाचा मृतदेह काढला बाहेर, 2 जणांचा शोध सुरु

■ **अहिल्यानगर। प्रतिनिधी,**

अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा तालुक्यातील सोनई इथं धक्कादायक घटना घडली आहे. साठवण तलावात तीन लहान मुले बुडाल्याची घटना घडली आहे. ८ ते 12 वर्ष वयाची ही मुले पोहताना बुडाली आहेत. दुपारी तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान ही दुर्घटना घडली आहे. पाण्याचा अंदाज न आल्याने ही दुर्घटना घडली आहे.

दरम्यान, मुले बुडाल्याची माहिती मिळताच स्थानिक लोक एकत्र आले. त्यानंतर लगेच पोलीसही घटनास्खळी दाखल झाले आहेत. स्थानिक नागरिक आणि पोलीसांच्या मदतीने एकाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश मिळालं आहे. आणखी दोन मुलांचा शोध सुरु आहे. पोलीस आणी बचावपथक घटनास्थळी दाखल झाले आहे. दरम्यान, या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नंदूरबार जिल्ह्यात बोगस डॉक्टर करतोय आदिवासींवर बिनधास्त उपचार, प्रशासनाचे दुर्लक्ष

■ **नंदुरबार। प्रतिनिधी,**

नंदुरबार जिल्ह्याच्या धडगाव तालुक्यातील एक धक्कादायक वास्तव समोर आले आहे. इथे गरीबी आणि अज्ञानाचा फायदा घेत एका बोगस डॉक्टरने आदिवासींच्या जीवाशी खेळ मांडला आहे. ना कोणती पदवी, ना कोणता परवाना, केवळ १२ वीपर्यंत शिक्षण असलेला एक तरुण स्वतःला डॉक्टर म्हणवून घेत सातपुड्याच्या दुर्गम भागात आपला धंदा चालवत असल्याचे उघडकीस आले आहे.

सातपुड्याचा दुर्गम डोंगऱ्यांचा भाग असलेल्या धडगाव तालुक्यातील गुंडाचापडा परिसरात सरकारचे दुर्लक्ष झाले आहे. याच परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून एका बोगस दवाखान्याचा



**आरोग्य विभागाचे मोठे दुर्लक्ष**

आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळेच सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यात असे विचित्र डॉक्टर फोफावले आहेत. आता या बोगस डॉक्टरची कबुली तर समोर आली आहे, पण यावर आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासन काय कारवाई करणार? हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

कारभार बिनबोभाट सुरू होता. पश्चिम बंगालच्या कोलकात्याहून आलेला हा बंगाली डॉक्टर आदिवासी बांधवांच्या विश्वासाचा फायदा घेत त्यांच्या आयुष्याशी खेळत होता. या तथाकथित डॉक्टरचे नाव आहे विचित्र बाबू मंडल असे आहे. हाताशी कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना हा पठ्ठ्या बिनधास्तपणे स्टेथोस्कोप लावून रुग्णांची तपासणी करायचा आणि त्यांना थेट औषधांचे डोस लिहून द्यायचा. धक्कादायक बाब म्हणजे, हा बोगस डॉक्टर स्वतःच मान्य करतोय की तो १२ वी पास आहे.

मात्र, तरीही तो रुग्णांना हाय-डोस औषधे तयार करून देत होता. प्रशासनाच्या डोळ्यात धूळ फेकून दुर्गम भागात त्याचा हा गोरखधंदा सुरू होता. शासनाने दुर्लक्ष होत असल्याने आदिवासी भागात असा बोगस डॉक्टरांनी आपले दुकान थाटले असून आदिवासींच्या जीवाशी त्यांचा खेळ सुरु आहे.




# संपादकीय



संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## जनगणना आणि राष्ट्रउभारणी!




प्रत्येक १० वर्षांनी जनगणना होणे अपेक्षित असतांना वर्ष २०११ नंतर ती कोरोना महामारी आणि अन्य काही अडचणी यांमुळे २०२२ मध्ये न होता अंतिमतः ती प्रक्रिया १ एप्रिल २०२६ पासून चालू होत आहे. या जनगणनेमुळे सामाजिक आणि आर्थिक स्तर; जातीय अन् धार्मिक आकडेवारी; स्त्री-पुरुष आणि वयोगट; कुठल्या प्रदेशात किती जण रहातात?, भाषिक आकडेवारी अन् कुणाला कुठल्या भाषा येतात? आदी वस्तूनिष्ठ माहिती मिळून घुसखोरी, स्थलांतर, कुणाला कुठल्या साहाय्याची आवश्यकता आहे किंवा ते काढून घेतले पाहिजे आदी अनेक गोष्टी उलगडता येणार आहेत. वरील सर्वांमागील सामाजिक, भौगोलिक, धार्मिक, आर्थिक आदी कारणे समोर येऊन अनेक व्यापक स्तरांवरील भारताचा संपूर्ण आडवा-उभा लेखाजोखाच समोर येणार आहे. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असणाऱ्या, महासत्ता होऊ पहाणाऱ्या भारताची जनगणना इतकी महत्त्वाची आहे की, तिचे केवळ भारतावर राजकीय आणि सामाजिकच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरांवर विविधांगी परिणाम होणार आहेत. यामुळे अनेक लाभही होणार आहेत, तसेच भारताचे अंतर्बाह्य शत्रूही यातील माहितीचा अपलाभ उठवून भारतविरोधी कारवायांतही भर पाडू शकणार आहेत. हिंदुत्वनिष्ठ आणि शासन यांनी याविषयी सावध राहून जनगणनेच्या माहितीचा लाभ कसा करून घ्यायचा आहे?, ते बारकाईने अभ्यास करून ठरवावे लागेल. माहिती देणारा आणि घेणारा यांचा 'प्रामाणिकपणा' हा या जनगणनेच्या सत्यतेचा मुख्य पाया राहील. अर्थात् आता सर्व संगणकीय तंत्रज्ञानामुळे ('डिजिटलायझेशन'मुळे) यातील त्रुटी किंवा खोटेपणा अधिक पटकन लक्षात येऊ शकतो आणि काही आकडेवारीत काही संशयास्पद वाटले, तर संबंधित अधिकारी अधिक खोलात जाऊन परीक्षण करू शकतो; पण खोटी माहिती भरली गेली, तर पहिल्या टप्प्याला तरी ती पटकन लक्षात येईल, अशी सोय उपलब्ध आहे का? ते अद्याप लक्षात आलेले नाही. असे सांगण्यात येत होते की, नेहरूंच्या काळात एका उच्चवर्णीय जातीची संख्या समाजात अधिक असतांना ती अत्यल्प दाखवून जनगणनेच्या माहितीत मोठे फेरफार करण्यात आले. यातील सत्यता ठाऊक नाही; परंतु त्यामुळे आरक्षणादी अनेक मोठी राजकीय आणि सामाजिक समीकरणे पालटली, असेही म्हटले जाते. 'जनगणनेत अधिकाधिक 'सत्य' आणि बिनचूक माहिती येण्यासाठी आताही शासनाने विज्ञापने, समाज आणि प्रसारमाध्यमे आदींच्या माध्यमातून जनतेला जनगणनेचे अनन्यसाधारण महत्त्व अन् त्यासाठी सत्य माहिती देण्याचे महत्त्व सांगायला हवे', असे कुठेतरी वाटते. संपूर्ण देशात मिळून पोटजातींची अतीप्रचंड संख्या होत असल्यामुळे विशेषतः जातीची माहिती भरतांना पुष्कळच सतर्कता ठेवावी लागणार आहे. याविषयी काही सूचना देऊन जनतेला ह्यशिक्षितह्व करायला हवे का? तेही पहावे लागेल. संगणकीकरणाचे काही लाभ आहेत आणि काही तोटे आहेत. संगणकीकरणामुळे द्विरुक्ती टाळली जाऊ शकते, व्यक्तीच्या माहितीची वस्तूनिष्ठता लगेच लक्षात येऊ शकते आणि अधिक वस्तूनिष्ठ माहिती गोळाही होऊ शकते. मोठी सामुग्री (डाटा) एकाच वेळी कळू शकते, मानवी चुका टळून अधिकाधिक सदोष माहिती मिळू शकते, माहिती भरल्यावर ती तत्परतेने उपलब्ध होऊ शकते आदी अनेक लाभ आहेत. 'स्वतःची स्वतः माहिती भरणेही शक्य होणे', हेही या वेळेच्या जनगणनेचे वैशिष्ट्य आहे. या जनगणनेतील आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे विवाह न करता एकत्र रहाणारे ('लिव्ह इन रिलेशनशिप'मध्ये रहाणारे) यांना विवाहाप्रमाणे ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्याचे लाभ आणि तोटे येर्णाया काळातच लक्षात येतील. भारताची ही १६ वी जनगणना मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या जनगणनेतून लोकसंख्या, शैक्षणिक स्थिती, बेरोजगारी, व्यावसायिकांची संख्या हे सारे प्रदेशानुसार अद्ययावत् उपलब्ध होऊ शकणार असल्याने त्यातून विविध अहवाल सिद्ध करून सरकार राष्ट्ररचनेच्या दृष्टीने अनेक सकारात्मक निर्णयापर्यंत येऊ शकते. या जनगणनेच्या वेळी विजेच्या माहितीतून सौरऊर्जा किती जणांकडे आहे? आणि कोरोना महामारीनंतर कुणाचे किती स्थलांतर झाले?, हेही लक्षात येऊ शकणार आहे. या जनगणनेतून 'प्रत्येक घरात पाणी, वीज, शौचालय, गॅस आहे का?', ते कळणार आहे. संगणकीय तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन वीज आणि पाणी चोरी करणाऱ्यांना यातून पकडण्याची इच्छाशक्ती सरकार ठेवू शकते; परंतु भ्रष्टाचार पूर्ण गाडण्याची मानसिकता सध्या तरी प्रकषार्ने दिसून येत नसल्याने इतका व्यापक उद्देश त्यातून साध्य होईल का? याविषयी शंका आहे. खरोखरच जर ठरवले, तर शासन या जनगणनेच्या माध्यमातून एक मोठा 'नव्या राष्ट्रउभारणी'चा टप्पा गाठू शकते, हे मात्र निश्चित! रस्त्यावर रहाणारे, घुसखोर, विस्थापित हिंदू, कुख्यात गुंड आदी र्सायांची माहिती (एक प्रकारे) यातून मिळू शकणार आहे. खरे गरीब किंवा घुसखोर कोण? हेही यातून कळेल आणि शासनाने मनात आणले, तर विविध विभाग आणि यंत्रणा यांच्या समन्वयाने विविध वस्तूंची तस्करी, 'स्मगलिंग', खोटे धंदे, अवैध व्यवसाय, देशविघातक कारवाया आदी कोण करत आहे? हेही यातून एक प्रकारे उघड होण्यास मोठी संधी मिळू शकते. सरकारची इच्छाशक्ती असेल, तर या जनगणनेचा लाभ करून घेऊन या गोष्टी समूळ नष्ट करण्याच्या दिशेने सरकार पावले उचलू शकते. अगदी देशाच्या सर्व संवेदनशील सीमाभागांतील 'ये-जा'ही यातून काही प्रमाणात कळू शकते. या जनगणनेतून भारताला त्याची बलस्थाने आणि कमकुवतपणा कळणार आहे. शासनाने जनगणनेच्या व्यापक माहितीच्या आधारे संपूर्ण देशात राष्ट्रहिताच्या दृष्टीने काय परिवर्तन होऊ शकते? याचा 'रोड मॅप' (नियोजन आराखडा) केला, तर त्यातून केवळ क्रांतीकारी योजना आणि विकासच नव्हे, तर देशातील अपप्रकार, अवैध मालमत्ता, अनधिकृत व्यवसाय, भ्रष्टाचार, घुसखोरी, रस्त्यापासून सीमेपर्यंत झालेली अतिक्रमणे या गोष्टीही त्यांतील विविध विभागांच्या अभ्यासाने आणि संगणकीय गुणसूत्रे जळवून उघड्या पाडणे शक्य होऊ शकते. या अद्ययावत जनगणनेचा लाभ उठवून सरकारने या र्साया गोष्टी नष्ट करण्यासाठी कृतीशील होऊन खऱ्या अर्थाने आदर्श राष्ट्रउभारणी करण्यासाठी वाटचाल केली, तर रामराज्य येण्यास आरंभ होईल. श्रीराममंदिराच्या निर्मितीनंतर विकासासमवेतच प्रभु श्रीरामांसारखी आदर्श राष्ट्रउभारणी हे ध्येय जर शासनाने ठेवले, तर भारतातील सर्व प्रकारची ऊर्जा अधिक प्रज्वलित आणि प्रबळ होऊन तो खरी महासत्ता बनेल!

## सवलतीचा अर्धविराम



जगातील अन्य देशांमध्ये इंधन टंचाई आणि दरवाढीचे सत्र सुरू झाले आहे, त्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने उचललेले हे पाऊल ही काळाची गरज आहेच; अर्थात युद्ध आणखी काही काळ सुरू राहिले, तर मात्र आपल्यालाही सुपातून जात्यात जाण्यास वेळ लागणार नाही, अशीच चिन्हे आहेत.

अवघ्या काही आठवड्यांतच कच्च्या तेलाच्या किमती जवळपास दुप्पट झाल्या आहेत, ज्यामुळे सरकारने तातडीने पावले उचलली आहेत. काही दिवसांपूर्वीच, पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात (Excise Duty) लक्षणीय कपात करणारा एक आदेश जारी करण्यात आला. पेट्रोलवरील उत्पादन शुल्क १० रुपये प्रति लिटरवरून ३ रुपये प्रति लिटरपर्यंत खाली आणण्यात आले आहे, तर डिझेलवरील उत्पादन शुल्क १० रुपये प्रति लिटरवरून थेट शून्यावर आणले गेले आहे. यामागील उद्देश अगदी स्पष्ट होताः इंधन पंपांवर वेगाने वाढत असलेल्या इंधनाच्या किमतींपासून सामान्य नागरिकांचे संरक्षण करणे, तेल विपणन कंपन्यांवरील (OMCs) ताण कमी करणे आणि जागतिक स्तरावर बसणारा आर्थिक धक्का देशांतर्गत पातळीवर पेलून घेणे. हे पाऊल उचलून, सरकारचा उद्देश किमतींमध्ये होणारी अशी कोणतीही तात्काळ व तीव्र वाढ रोखणे हा आहे, जिचा फटका कुटुंबांच्या बजेटला आणि वाहतुकीच्या खर्चाला बसू शकतो.

विरोधी पक्षांच्या आरोपांनुसार, येत्या महिन्यात होऊ घातलेल्या पाच विधानसभांच्या निवडणुकांमध्ये या संभाव्य इंधन दरवाढीचा राजकीय फटका बसू नये, असा आनुषंगिक मुद्दा सत्ताधाऱ्यांनी विचारात घेतला असेलच. सर्वोच्च नेत्याला ठार केल्यानंतर इराण चुटकीसरशी शरण येईल; पयार्याने फार तर आठवड्याभरात युद्ध संपेल, हा अमेरिका-इस्रायलचा दावा फोल ठरला. उलटपक्षी होर्मुझ सामुद्रधुनीतून जहाजांना अटकाव करण्याच्या इराणच्या खेळीने साऱ्या जगातील तेलपुरवठ्याची गणिते बिघडवून टाकली आहेत. होर्मुझच्या नाकेबंदीचा फटका बसून एकीकडे अमेरिकेचेच मित्रदेश असलेल्या तेल पुरवठादारांची कोंडी झाली आहे, तर दुसरीकडे तेल-गॅसविना अनेक देशांची घुसमट सुरू आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सहकारी दररोज उलटसुलट विधाने करीत असल्याने जगभरातल्या शेअर बाजारांसह तेलाचा बाजारही तेजी-मंदीचे हेलकावे खात आहे. त्यातून सट्टेबाजांचे मात्र उखळ पांढरे होताना दिसत आहे.

तेल दरवाढीचा हा धक्का अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेला पेलवणारा नसल्यामुळे शेजारील पाकिस्तान, श्रीलंका आणि नेपाळसह खुद्द अमेरिकेसारख्या देशांतही इंधनाच्या दरात २० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. त्या तुलनेत भारतामध्ये साठा उपलब्ध असल्याने आणि रशियातून तेल येत असल्याने ग्राहकांना अद्याप टंचाई-दरवाढीचे चटके बसलेले नाहीत; मात्र तेल कंपन्यांना प्रतिलिटर सुमारे २५ रुपये अधिक मोजावे लागत आहेत. त्यांचा तोटा तीन हजार कोटी रुपयांच्या घरात गेला आहे. तोटा सोसणे आवाक्याबाहेर गेल्यास इंधन दरवाढ हाच पर्याय असल्याने सरकारने उत्पादन शुल्कात सवलत देऊन प्रतिलिटर दहा रुपयांचा दिलासा दिला आहे. इंधनाची दरवाढ झाल्यास वाहतुकीचे दर वाढून अत्यावश्यक वस्तूंसह एकंदर महागाईला तोंड द्यावे लागण्याची भीती आहे. या निर्णयाचा सत्ताधाऱ्यांनी गाजावाजा केला असला, तरी सध्या इंधन स्वस्त होण्याची कोणतीही शक्यता नाही; उलटपक्षी युद्ध लांबले, तेलाचे दर आणखी भडकले (आणि निवडणुका पार पडल्या) तर इंधन दरवाढीचीही टांगती तलवार कायम राहणारच.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेत 'कोरोना साथीसारखे आव्हान उभे राहू शकते,' अशा शब्दांत संभाव्य परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवण्याचे सूतोवाच केले आहे. त्यातून उलटसुलट तर्क काढून लॉकडाउनसारख्या शक्यताही व्यक्त झाल्या; मात्र सरकारने त्या फेटाळल्या आहेत. स्वयंपाकाच्या गॅसचे व्यवस्थापन मात्र कोलमडल्याचे दिसते. एकीकडे सरकार गॅसची टंचाई नाही, असे सांगत असताना ठिकठिकाणी लागलेल्या रांगा आणि बंद पडलेल्या हॉटेल-खानावळी आणि टपऱ्यांमुळे वास्तव समोर येत आहे. त्यातच निरनिराळ्या अफवांची नवी डोकेदुखी उभी राहिली आहे; त्यातूनच अनेक शहरांत पेट्रोल पंपांवर रांगा लागल्या. युद्ध लांबलेच, तर भरलेले पेट्रोल किती दिवस पुरणार, हा साधा विचारही कोणी करत नाही.

उत्पादन शुल्कात सवलत देऊन सरकारने तेल कंपन्या आणि सर्वसामान्यांना सध्यापुरता दिलासा दिला असला, तरी हे संकट इंधन-गॅसटंचाईपुरते मर्यादित नाही. युद्धस्थितीमुळे पेट्रोलियम पदार्थांसह खतांचा पुरवठाही अडकला आहे. गॅसपुरवठ्याअभावी हॉटेल-पर्यटन उद्योगापुढे अडचणी उभ्या राहिल्या आहेत, तर गॅसअभावी अनेक कारखाने बंद पडून कामगार बेरोजगार झाले आहेत. दुसरीकडे भारतातून आखाती देशांत जाणाऱ्या शेतीमाल-फळांसह अनेक वस्तूंची निर्यात रखडल्याने शेतकरी-व्यापारी चिंतेत आहेत. आयात महागल्याने रुपया दररोज नवनवा तळ गाठत आहे. अशा स्थितीत अर्थव्यवस्थेचे चक्र सुरू ठेवण्याचे मोठे आव्हान देशापुढे आहेच; त्याशिवाय या संकटातून धडा घेऊन ऊजार्सुरक्षेसाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्याची गरजही या निमित्ताने अधोरेखित झाली

## पुन्हा पुन्हा का निर्माण होतात भोंदू!

अशोक खरात या भोंदूबाबाने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केलेले आहे तसेच त्याने गेल्या काही वर्षात अमाप मालमत्ता मिळवली आहे, हे उघड झाल्यामुळे खळबळ उडाली आहे. पण गेली सुमारे वीस वर्षे खरातचे हे उद्योग शांतपणे सुरू होते. त्यावेळी त्याच्या उलाढालींचा कुणालाच कसा आसभास झाला नाही. आपला समाज खरोखर इतका झोपी गेला आहे का? की समाजातील अनेकांना अल्पावधीत मोठा फायदा मिळवण्यासाठी अशा भोंदूंची गरज असते. त्यामुळेच असे भोंदू पुन्हा पुन्हा निर्माण होतात.



अनेक महिलांची लैंगिक फसवणूक करर्णाया आणि कोट्यवधीची मालमत्ता तसेच जमिनी खरेदी करर्णाया भोंदू अशोक खरात याची चर्चा सध्या जिकडे पहावी तिकडे दिसत आहे. वृत्तवाहिन्यांवर त्याच्याच बातम्या दिसत आहेत. खरातने गेल्या अनेक वर्षांमध्ये जे काही साम्राज्य उभे केले आहे, त्याचा शोध घेता घेता तपास यंत्रणांची दमछाक होत आहे, असे म्हणावे लागेल. ज्या गोष्टीचा विस्तार इतका व्यापक असतो, त्याची उभारणी काही एका दिवसात होत नसते. त्यासाठी बरीच वर्षे गेलेली असतात. कोट्यवधींची आर्थिक मालमत्ता जमवणारा आणि महिलांचे लैंगिक शोषण करणारा हा काही पहिलाच अशोक खरात नाही. असे भोंदू यापूर्वीही झाले, आजही अस्तित्वात असतील, पण ते सापडलेले नसतात. काहीजण खरातसारखी आपलीही वरात निघू नये, म्हणून सावध झाले असतील. पुढेही असे खरात होत राहतील, असे एकूणच समाजाची मानसिकता पाहिल्यावर लक्षात येईल.

मुळात असे भोंदूबाबा कसे निर्माण होतात हा प्रश्न आहे. मुळात असे लोक दिसायला साधे वाटत असले तरी ते अतिशय धूर्त असतात. ते दुर्सयांशी बोलताना प्रचंड आत्मविश्वासाने बोलतात. तुमचे काम होणार म्हणजे होणारच, असा ते ठामपणे दावा करतात. समाजात विविध प्रकारची कामे अडलेले अनेक स्त्री आणि पुरुष असतात. हीच या बाबा बुवांची सावजे असतात. हतबल झालेला माणूस कुठला तरी आधार शोधत असतो. अतिशय तहानलेल्या माणसाला घोटभर पाणी मिळालं तरी ते त्याला अमृतासारखं नवसंजीवनी देणारं वाटतं. समाजातील अशीच माणसे अशा बाबा बुवांच्या शोधात असतात, असे बाबाही अशा गरजू माणसांच्या शोधात असतात. दोन्ही बाजूंच्या गरजा जुळल्या की, मग जे काही होते ते कल्पनेच्या पलीकडचे असते.

अशोक खरातसारखी माणसे निर्माण होण्यासाठी सभोवतालची सामाजिक परिस्थितीही कारणीभूत असते. कारण अशा भोंदूंना मानणारा वर्ग गोळा होत जातो. त्यांच्यावर डोळे झाकून विश्वास ठेवतो, एकदा त्या बाबाच्या लक्षात आले की, माणसे पूर्णपणे आपल्याला वश झालेली आहेत, मग त्याच्या मनातील विविध इच्छा उफाळून येतात. त्याचाच परिणाम गैरकृत्यामध्ये होऊ लागतो. अशा बाबाप्रवृत्तीला खतपाणी घालणारी गरजू मंडळी समाजात असतात. त्यामुळेच बाबाचे साम्राज्य बिनबोभाट पसरत जाते. हे बाबा लोक आपल्याकडे काहीतरी सिद्धी आहेत, असा आभास निर्माण करण्यात यशस्वी ठरतात. अडला नारायण धरी गाढवाचे पाय, या नियमानुमार मग सुशिक्षित शहाणे लोकही त्या बाबाचे पाद्यपूजन करू लागतात. त्याचे पाय धुतलेले पाणी तीर्थ म्हणून पिऊ लागतात.

इतकेच नव्हे तर तो जे काही द्रव देईल ते तीर्थ म्हणून पिऊ लागतात. जो काही पदार्थ देईल, तो प्रसाद म्हणून खाऊ लागतात. त्याचा आपल्या शरीरावर आणि मनावर काय परिणाम होत आहे, याचा बाबाच्या भजनी लागलेले लोक विचार करत नाहीत. अशा बाबा मंडळींना जर राजाश्रय मिळाला, म्हणजे राजकीय नेते, मंत्री त्यांचे भक्तगण झाले तर मग बाबा बिनधास्त होतो, कारण त्याला त्याच्या कुठल्याही गैरकृत्यावर काही कारवाई होईल, याची भीती राहत नाही. त्याने काही गैरकृत्य केले आणि ते उघडकीस आले, तरी ते पद्धतशीरपणे दाबले जाईल, याची त्याला खात्री असते.

कारण तपास यंत्रणांनी कितीही कसून तपास केला तरी त्याला विविध प्रकारे फाटे फोडून बाबाला वाचविण्याचे काम त्याचे राजकीय भक्तगण करू शकतात. त्यात पुन्हा त्याने स्वतःभोवती संतपणाची आध्यात्मिक चादर लपेटलेली असते. त्यामुळे कुणीही त्याच्याकडे गेला तरी त्याला अगोदर नमस्कार करतो. मग तो कुणीही असो, या सगळ्याची फोटोग्राफी बाबाने ठेवलेली माणसे करत असतात.

बाबा त्याची पद्धतशीर प्रसिद्धी करतो. एकदा नेता बाबाकडे जातो असे लक्षात आले की, त्याचे कार्यकर्ते त्या बाबाकडे जाऊ लागतात. मग ते कार्यकर्ते जनतेमध्ये बाबाचा प्रचार करतात. काही राजकीय नेत्यांना असे बाबा म्हणजे एकगठ्ठा मतांची व्होटबँक वाटते, कारण निवडणुकीपूर्वी बाबाने त्याच्या भक्तांना अमूक नेत्याला मत द्यायला सांगितले की, भक्त त्याप्रमाणे वागतात, असा नेत्याला विश्वास असतो. मग बाबाचे मोठे दरबार भरू लागतात. बाबाचे स्वतंत्र साम्राज्य तयार होते.

राजकीय ओळखीतून तो प्रचंड आर्थिक ताकद निर्माण करतो. धार्मिक कायार्साठी मोक्याच्या जागा, शासकीय सुविधा मिळविल्या जातात. धार्मिक कार्य असल्यामुळे कुणी विरोध करत नाही, कारण सगळ्यांनाच पुण्य पदरात पाडून घ्यायचे असते. त्यात आपल्या समाजाच्या मानसिकतेवर पाप-पुण्य यांचा प्रचंड पगडा असतो. शापवाणीची प्रचंड भीती असते. त्यामुळे अशा बाबाची प्रचंड दहशत निर्माण होते. त्याला मग त्याच्या दर्शनाला येर्णाया राजकीय नेत्यांपासून ते इतर भक्त मंडळीही घाबरून असतात. त्यातून हा बाबा अनेक राजकीय नेत्यांचा, उद्योजकांचा, अधिर्कायांचा गॉडफादर बनून जातो. मग गॉडफादर जसे बोलेल तसे ते वागू लागतात. तो सांगेल तसे ते निर्णय घेऊ लागतात. स्वतः विचार करणे ते सोडून देतात. माणूस जेव्हा स्वतः विचार करणे सोडून देतो तिथेच त्याच्या पतनाला सुरुवात होते.

ज्या लोकांच्या जीवनात विविध कारणांमुळे अस्थिरता आणि अनिश्चितता निर्माण झालेली असते, ज्यांना असुरक्षित वाटत असते, त्यांना कुठल्या तरी व्यक्तीच्या आधाराची गरज असते. आध्यात्मिक गुरू असल्याचा आव आणणारे असे बाबा ती गरज पुरवत. २०१९ सालानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड अस्थिरता निर्माण झालेली आहे. उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या युतीतून बाहेर पडून काहीही करून मुख्यमंत्रीपद मिळवण्यासाठी शरद पवार आणि काँग्रेस यांच्याशी हातमिळवणी करून अकल्पित महाविकास आघाडी तयार केली. काहीही करून अडीच वर्षात भाजपने उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकार पाडले. त्यासाठी शिवसेनेत फूट पाडून एकनाथ शिंदे यांना आपल्यासोबत घेतले. पुढे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडली आणि अजित पवार वेगळे झाले. ते भाजपसोबत सत्तेत आले. पुढे देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये मुख्यमंत्रीपदावरून अप्रत्यक्षपणे चढाओढ सुरू झाली. त्यात पुन्हा अजित पवार यांना मुख्यमंत्री व्हायची इच्छा होती. तीन पक्ष सत्तेत असल्यामुळे मंत्रीपदे, पालकमंत्रीपदे मिळवण्यासाठी प्रचंड चढाओढ सुरू झाली. अशा स्थितीत या अस्थिरतेतून आपल्याला मार्ग दाखवेल, अशी व्यक्ती नेत्यांना हवी असते.

अशोक खरात हा राज्यातील अनेक मंत्री आणि आमदारांसाठी अशी व्यक्ती ठरला. त्यामुळे अनेकजण त्याचे भक्त झाले. त्यात पुन्हा खरातने आपण चांगले ज्योतिषी असल्याचे अनेकांच्या मनावर बिंबवले. सध्याच्या अस्थिर परिस्थितीत आपले ज्योतिष जाणून घेण्यासाठी किंवा नशीब बदलून घेण्यासाठी अनेकजण उत्सुक होते. त्यामुळे खरातचे महत्त्व आणि त्याचसोबत मालमत्ता वाढत गेली. एका समान मध्यस्थाची लोकांना गरज असते. या मध्यस्थाची म्हणजे दलालाची सर्व क्षेत्रातील लोकांची ओळख असते. त्यामुळे अनेकांची जी अडलेली कामे असतात, त्यावर हा बाबा तोडगा काढून देतो. जी कामे करण्यासाठी दीर्घ मेहनत आणि धावपळ करावी लागते ती कामे शॉर्टकटने बाबा करून देतो. त्यासाठी बाबा पैसे घेत असतो, महिला असतील, तर त्यांच्याकडून त्याची काही तरी वेगळी अपेक्षा असते. त्यामुळे महिलाही पुढे बदनामीच्या भीतीने त्याच्या जाळ्यात गुंतत जातात. एकदा जाळ्यात सापडले की त्यातून बाहेर पडणे अवघड असते.

अशोक खरात याने महिलांची जी लैंगिक फसवणूक चालवली होती, त्याचा व्हिडिओ पोलिसांच्या हाती लागला म्हणून त्याचे बिंग फुटले. नाहीतर हे असेच सुरू राहिले असते. अशोक घरात याने गेल्या वीस-पंचवीस वर्षात जी प्रचंड मालमत्ता मिळवली आहे, त्याचे कोटी कोटींचे आकडे पाहून आपण अवाक होतो. त्याचा तपास सुरू आहे. अशोक खरात मुळचा नाशिकचा. त्याच्या प्रचंड मालमत्तेवरून नाशिकमधीलच एक नेते आणि विद्यमान मंत्री यांच्या जीवनातील घटनाक्रम आठवतो. या मंत्री महोदयांच्या मालमत्तांवर ईडीने आणि आयकर खात्याने धाडी टाकून जी मालमत्ता उघड केली होती, ते वृत्तवाहिन्यांवर पाहताना लोक चाट झाले होते. या मंत्र्यांना मनी लाँड्रिंग म्हणजे काळा पैसा गोरा करण्याच्या आरोपाखाली तुरुंगवास भोगावा लागला होता. त्यांची तब्येत ढासळली होती. केस पांढले झाले. आता यांचे काही खरे नाही असे वाटत होते.


पण त्यांना आजारपणावरील उपाचारासाठी जामीन मिळाला. त्यानंतर ते बाहेर आले. त्यांची तब्येत झपाट्याने सुधारली. आता ते महत्त्वाचे मंत्रीपद भूषवत आहेत. या मंत्रीमहोदयांना जेव्हा त्यांच्या प्रचंड मालमत्तेबद्दल प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा तो मी नव्हेच, अशा छापाची उत्तरे देऊन त्यांनी पत्रकारांनाच निरुत्तर केले होते. अशोक खरात याने महिलांच्या लैंगिक शोषणावर न्यायालयात बोलताना, तो त्याच्या आध्यात्मिक विधीचा भाग होता, असे उत्तर दिले आहे. नंगे को खुदा भी डरता हैं, निर्लज्जम सदा सुखी, अशा म्हणी आहेत. याच तत्वाला अनुसरून ही मंडळी जगत असतात. त्यामुळे त्यांना शिक्षेच्या कचाट्यात पकडणे हेही एक आव्हान असते.

## राजाश्रयाने वाढणारे बांडगुळ बाबा!

देशात अंधश्रद्धेविरोधी कायदा प्रथम बनवर्णाया महाराष्ट्रातच भोंदूबाबांचे प्रचंड पेव फुटले आहे आणि मंत्रतंत्र-जादूटोणा करर्णायांनी उच्छाद मांडला आहे. गंभीर बाब म्हणजे हे सर्व वषार्नुवर्षे सुरू आहे. याचा एका ओळीत अर्थ सांगायचा तर कायदा बनला असला तरी कायद्याचा धाक उरलेला नाही. राज्य सरकारने अंधश्रद्धाविरोधी कायदा करावा यासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर आणि महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती दीड तप संघर्ष करत होते. तो कायदा दाभोलकरांची 20 ऑगस्ट 2013 रोजी हत्या झाल्यानंतर करण्यात आला. तोही अंधश्रद्धा निर्मूलन नाही तर जादूटोणाविरोधी कायदा. म्हणजे कायदा बनवतानाही कशी पळवाट काढली गेली, हे लक्षात येते. वास्तविक महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. आपले संत अत्यंत पुरोगामी विचारांचे होते. या संतांनीच अंधश्रद्धेवर अभंग आणि त्यांच्या रचनेतून कायम प्रहार केला. मात्र, संतांनी दिलेले विचार बाजूला सारत आपण त्यांना केवळ पूजेपुरते मर्यादित ठेवले. त्याचीच फळ आपण भोगत आहोत. आतापर्यंत जेव्हा जेव्हा लैंगिक अत्याचाराची प्रकरणे उघडकीस आली तिथे राजकीय संबंध किंवा राजकीय वरदरस्त समोर आला आहे. नाशिकमधील भोंदूबाबा आणि स्वयंघोषित कॅप्टन अशोक खरात याची काळी कृत्ये उघडकीस आल्यानंतर आणि त्याला राजकीय नेते, प्रशासनातील अधिकारी आणि पोलिसांकडून सहकायार्चा हात पाहिला तर पुरोगामी महाराष्ट्राच्या अब्रुचे आणखी किती धिंडवडे काढणार, असा प्रश्न उपस्थित होतो. आसाराम बापू, राम रहीम बाबा आज लैंगिक अत्याचार प्रकरणात तुरुंगात असले तरी ते एकेकाळी पूजनीय होते. त्यांच्यावर राजकीय वरदहस्त होता, हे लपून राहिलेले नाही. त्यानंतर लैंगिक शोषणाच्या अनेक घटना राज्यासह देशात उघड झाल्या. मात्र, महाराष्ट्रात बाबा-बुवांकडून लैंगिक शोषण, अत्याचार प्रकरणात जेवढी हिंमत दाखवली जाते, तेवढी क्वचितच इतर राज्यांत दाखवली जाते. राज्यात जादूटोणाविरोधी कायदा असूनही बाबा-बुवांचे पेव फुटत असेल, लोक त्यांच्या मागेपुढे धावत असतील तर राज्यासाठी यापेक्षा लाजिरवाणी घटना नाही. यापूर्वी जळगाव सेक्स स्कँडलने महाराष्ट्रासह देश हादरला होता. 1993 मध्ये हे प्रकरण उघडकीस आले. यात अनेक राजकीय मंडळी, काही बडे प्रस्थ सहभागी होते. शाळा-कॉलेजमधील मुलींना जाळ्यात ओढून त्यांच्यावर लैंगिक अत्याचार केले जायचे. त्यानंतर त्यांना ब्लॅकमेल केले जायचे. अंदाजे 500 अल्पवयीन ते महिलांपर्यंत यात अडकले होते. जळगाव सेक्स स्कँडलनंतर खरात वासनाकांड उघड झाले आहे. यात आतापर्यंत 6 तक्रारी दाखल झाल्या असून 100 पेक्षा जास्त व्हिडिओ तयार झाल्याची माहिती मिळत आहे. आपली नेते मंडळी, राजकीय पुढारी जर जादूटोणा करणारे, तांत्रिक-मांत्रिकांच्या आश्रयाला जात असतील तर लोकांनी आदर्श तरी कुणाचा घ्यायचा? बडी मंडळी बाबा-बुवांचे पाय धूत असतील, त्यांच्या पायावर डोकं ठेवत असतील तर आम जनता असल्या बाबांच्या आहारी गेल्यास आश्चर्य वाटायला नको. मात्र, यातून नुकसान होते ते जनतेचेच. महाराष्ट्रात जरा नीट डोळे उघडून पाहिल्यास राजकीय आश्रय असलेले कितीतरी बाबा कथित ह्यसामाजिक कार्याह्वच्या आडून समाजात वावरत आहेत, हे लक्षात येईल. यांच्या ट्रस्टची कुणी चौकशी केली तर उत्पन्नाचे स्त्रोत आणि प्रचंड संपत्ती कशी जमली, याचा शोध घेणे सहज शक्य होईल. प्रत्येक वेळी तक्रारच करायला पाहिजे असे नाही. कुणाची संपत्ती महाप्रचंड वेगाने वाढत असेल तर प्राप्तीकर परतावा भरताना इन्कम टॅक्स खात्याकडे सर्व माहिती आलेली असते. धमार्दाय आयुक्तांनीही अशा बाबांच्या ट्रस्टचे कठोर ऑडिट केले तर अनेक घोटाळे बाहेर येऊ शकतात. मात्र, मतांचे राजकारण नेहमीच आडवे येते. अशा चौकशीमधून खूप काही बाहेर येऊ शकते. मात्र, अशा बाबांना राजकीय संरक्षण मिळत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कुणी तक्रार करायला धजावत नाही आणि तक्रार आलीच तरी पोलीस लगेच कारवाई करतील, याचीही खात्री देता येत नाही. एवढी वर्षे लोकांची आर्थिक तसेच महिला-मुलींवर लैंगिक अत्याचार करर्णाया खरात प्रकरणावरून ही बाब पुन्हा प्रकाशझोतात आली आहे. एक लाखाचा चिंचोका, 9 लाखांना मधाची बाटली विकणारा आणि रिमोटने नकली साप दाखवून अंधश्रद्धेला खतपाणी घालर्णाया खरातच्या चरणावर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा लीन झाल्यामुळे सरकारच्या अब्रुचे र्खया अथार्ने धिंडवडे निघाले आहे. या भोंदूबाबा खरातच्या नावावर प्रचंड जमिनी कशा झाल्या, त्याने शेकडो कोटींची मालमत्ता कशी जमवली. बंगले, फ्लॅट, परदेशात मालमत्ता, आलिशान गाड्या कुठून आल्या याचा कुणालाही सुगावा लागू नये, एवढी आपली व्यवस्था बथ्थड आहे का? या सर्वांना एकच उत्तर ते म्हणजे राजकीय वरदहस्त! नियम, कायदा हे सर्व सर्वसामान्य जनतेसाठी असतात. मोठ्या लोकांवर त्यातही नेते मंडळींवर कारवाई करताना पोलीसदेखील दचकून असतात. एकीकडे कायद्यापुढे सर्व सारखे असतात म्हणायचे आणि अशा मंडळींना कायद्याची तीच कलमे लावायची नाहीत, असा भेदभाव केला जातो. त्यामुळे अशा बाबांचे आयतेच फावते. ही परिस्थिती बदलणार नाही तोपर्यंत वासनाकांड सुरूच राहणार, बाबा लोकांचे काळे धंदे उजळमाथ्याने सुरू राहणार. एखादे प्रकरण उघडकीस आल्यानंतर काही दिवस चर्चा होणार आणि दुसरे प्रकरण समोर आले की पहिले प्रकरण विस्मरणात जाणार. काही दिवस एपस्टिन फाइल्सची चर्चा सुरू होती, आता खरात फाइल्स चर्चेत आली आहे. यातून काय तो बोध घ्यावा!

**कोकणात काजूचा हंगाम सुरू झाला की ओल्या काजूगराची चविष्ट भाजी घराघरांत बनवली जाते. नारळ, मालवणी मसाला आणि ताज्या काजूगराचा सुगंध यामुळे ही भाजी अतिशय खास आणि स्वादिष्ट लागते. साध्या पण पारंपरिक पद्धतीने तयार होणारी ही रेसिपी जेवणाची चव वाढवते. गरम भाकरी, पोळी किंवा भातासोबत ही भाजी अप्रतिम लागते. कोकणी खाद्यसंस्कृतीत या पदाथार्ला विशेष स्थान आहे. थोड्या साहित्यांत आणि सोप्या पद्धतीने तयार होणारी ही भाजी पौष्टिक ठरते. घरच्याघरी चवदार ओल्या काजूगराची मालवणी स्टाईल भाजी कशी बनवायची ते जाणून घ्या.**

## ओल्या काजूची भाजी



**साहित्य :** काजू - 2 कप, बारीक चिरलेला कांदा - 2, किसलेलं खोबरं - 1 कप, चिरलेला टोमॅटो - 1, नारळाचे दूध - 1 कप, मोहरी - 1 चमचा, जिरे - 1 चमचा, हळद पावडर - 1 चमचा, धणेपूड - 1 चमचा, लाल मिरची - 1 चमचा, तेल - आवश्यकतेनुसार, चवीनुसार - मीठ, कोथिंबीर - सजावटीसाठी

**पाककृती :** सर्वप्रथम काजू अर्ध्या तासासाठी भिजत ठेवा. अर्ध्या तासानंतर भिजवलेले काजू गाळून बाजूला ठेवावेत. एका कढईत तेल गरम करण्यास ठेवावे. दोन्ही पदार्थ तडतडण्यास सुरुवात झाल्यावर त्यात कांदा घालून सोन्री रंगापर्यंत परतून घ्यावा. त्यात आता टोमॅटो घालून मऊ होईपर्यंत शिजवा. नंतर त्यात हळद, धणेपूड, लाल तिखट घालून 2 ते 3 मिनिटे शिजवून घ्या. नारळाची पेस्ट करण्यासाठी मिक्सरमध्ये किसलेलं खोबऱ्यात थोड पाणी घालून पेस्ट बनवावी. तयार पेस्ट भाजीत मिक्स करा, नारळाचे दूधही घाला. आता सर्व मिश्रण ढवळून घ्यावे आणि एक उकळी आणावी. भाजीवर झाकण ठेवून काजू शिजवून घ्यावेत. आवश्यकतेनुसार मीठ आणि चिरलेली कोथिंबीर घालून एकजीव करून घ्यावे. अशा पद्धतीने तयार झाली आहे ओल्या काजूची चविष्ट भाजी.

**अधिक टिप्स : ■ तुम्ही तुमचा स्वतःचा घरगुती मसाला वापरू शकता. ■ मालवणी किंव्हा घरगुती मसाला नसेल तर (१ टीस्पून मिरची पूड २ टीस्पून गरम मसाला किंव्हा गोड मसाला) असे वापरा. ■ काजू आकाराने मोठे असले तर शिजायला वेळ लागतो. ■ अर्धवट शिजलेले ओले काजू अजिबात चांगले नाहीत.**
**सालं काढून काजू फ्रीजर मध्ये ठेवले तर महिनाभर चांगले रहातात. ■ ओले काजु उपलब्ध नसतील तर न खारवलेले, सुके काजू दोन तास पाण्यात भिजत घालून वापरावेत. अर्थात ओल्या काजूंचा स्वाद त्याला नाही येत. ■ या भाजीत उकडलेले अंड खूप छान लागते. भाजी शिजली कि उकडलेल्या अंड्याचे चार तुकडे करून भाजीत वरून अलगद घालावेत.**

# बियरचा वापर केल्याने केस होतात सिल्की आणि शाईन

**सुंदर केस एखाद्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वात अधिक भार टाकतात. मग तो पुरुष असो की महिला. सर्वांनाच आपल्या केसांना शाइनी आणि सिल्की ठेवण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारांच्या प्रॉडक्ट्सचा वापर करावा लागतो, पण या प्रॉडक्ट्समुळे केसांना नुकसान होण्याची भीती सदैव असते. म्हणून घरगुती कंडिशनरच केसांसाठी उत्तम असतात. म्हणून जाणून घेऊ अशा काही घरगुती कंडिशनर्सबद्दल...**

▮ एक कप बियरला एखाद्या भांड्यात तोपर्यंत गरम करा जोपर्यंत त्याचे प्रमाण अर्धे राहत नाही. गरम केल्याने बियरमधील अल्कोहोल वाफ बनून उडून जाते. आता याला गार होऊ द्या, नंतर यात आपल्या पसंतीचा शॅम्पू मिसळून द्या, लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे ज्या शॅम्पूचा वापर करत असाल तो एकाच ब्रँडचा असायला पाहिजे. या घोळला एका बाटलीत भरून ठेवा. जेव्हा कधी केस धुवायचे असतील याने केस धुवा, यामुळे राठ केसांमध्ये देखील निखर येईल. केस चमकदार आणि सुंदर दिसतील.



▮ केळी केसांसाठी फारच उत्तम मानण्यात आले आहे. केळींची पेस्ट तयार करून त्यात काही थेंब मधाचे टाकून ही पेस्ट ३० मिनिटांपर्यंत केसांवर लावून ठेवावी. नंतर गार पाण्याने केस धुवून टाकावे.

▮ आपल्या केसांना शॅम्पूने धुतल्यानंतर बियरचे काही थेंब पाण्यात घालून त्या पाण्याने एकदा परत केस धुवून टाकावे. नंतर स्वच्छ पाण्याचे धुवावे. बियरमुळे तुमच्या केसांमध्ये चमक येईल आणि ते प्राकृतिकरीत्या मजबूत होतील.

▮ केसांना शाईनी बनवण्यासाठी दह्यात शॅम्पू घालून आधीपासून लावून ठेवावे. डोक्यात जर कोंडा असेल तर काही थेंब लिंबाचा रस त्यात घालून केसांना लावावे. वर दिलेले हे उपाय केल्याने नक्कीच फायदा होईल.

**प्रत्येकाला आपलं वजन कमी झालं पाहिजे अशी तीव्र इच्छा असते. यासाठी सगळे उपाय करण्यासाठी आपण तयार असतो.**

## शरीरातील कॅलरी कमी करण्यासाठी हे करा...

**अनेक** प्रयत्न करूनसुद्धा वजन कमी करण्याबाबत आपण अपयशी ठरतो. जास्त कष्ट न घेता आपण घरगुती उपाय करून शरीरातील जास्त कॅलरी कमी करू शकतो.

**घरबसल्या हे सोपे उपाय करा..**

■ फळ रस पिण्याऐवजी जास्त फळे खा. फळांमध्ये फायबर आणि साखरेचे संतुलित प्रमाण असते यामुळे कॅलरी वाढत नाहीत. ■ पालेभाज्या आणि फळभाज्यांचा आहारात जास्तीत जास्त समावेश करा. मांसाहारी जेवण होईल तेवढं टाळण्याचा प्रयत्न करा. ■ घाईघाईत जेवू नये जेवण चावून खा त्याने शरीरातील कॅलरीज कमी होतात. ■ योग्य तेवढी झोप पूर्ण घ्या त्यामुळे कॅलरी वाढण्याचे प्रमाण कमी होते.



# आरोग्याचा स्रोत – जिरा पाणी

**सकाळी** उपाशीपोटी पाणी पिणे किंवा तांब्याच्या भांड्यात साठवलेले पाणी पिणे म्हणजे आरोग्याचे वरदान हे आपण बरेचदा वाचलेले आहे. परंतु याच पद्धतीने दिवसभरात कधीतरी एक ग्लासभर जिरा पाणी प्राशन केले तर आरोग्याला खूप मदत होते. जिरा पाण्यामुळे शरीरात पाचकद्रव्ये मोठ्या प्रमाणावर तयार होतात आणि पचन क्रियेला गती मिळते. पोटाच्या विकारावर जिरा पाण्याचा उपयोग होतो. प्यायलेले पाणी शरीराला उपयोगी पडतेच असे नाही. परंतु जिरा पाणी प्राशन केल्याने तेही रात्री झोपताना प्राशन केल्याने दिवसभरात प्यायलेले पाणी उपयोगी पडायला लागते. जिरा पाण्यात पोटॅशियम असते आणि त्यामुळे रोग प्रतिकारशक्ती वाढते. रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी इतरही अनेक द्रव्ये उपयोगी पडतात. जिरा पाणी प्यायल्याने अशक्तपणा कमी होतो. कारण जिऱ्यातील आयर्न म्हणजेच लोह त्यादृष्टीने उपयोगी पडत असते. त्याच्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होतो. जिरा पाण्याने रक्तदाब आटोक्यात राहतो आणि वजन घटण्यास मदत होते. शरीरातील चयापचय क्रिया वेगवान करण्याची ताकद जिरा पाण्यात असते. त्याशिवाय जिरा पाणी त्वचेलाही उत्तम असते. त्वचेचे अनेक विकार जिरा पाण्यामुळे दुरुस्त होतात. जिरा पाणी तयार करण्यासाठी एक लिटर पाणी घ्या आणि त्यात २ चमचे जिरे टाकून चार ते पाच मिनिटे उकळवा. उकळल्याने पाण्याचा रंग बदलतो. हे पाणी काही वेळ थंड होऊ द्या. ते एका बाटलीत साठवून ठेवा आणि दिवसभरात जमेल तसे प्या. जिरा पाणी फार थंड करू नये. हे जिरा पाणी तयार करण्यासाठी कच्चे जिरे वापरावे. भाजलेले जिरे वापरू नये. त्यातल्या त्यात पूर्ण जिरे वापरावे. जिरा पावडर वापरू नये. दररोज स्वतंत्र जिरा पाणी तयार करावे. एक दिवस तयार केलेले जिरा पाणी दुसऱ्या दिवशी वापरू नये.



# चाळिशीतल्या चालीवरून तुमचं म्हातारपण कसं असेल हे कळणार?

**वयाच्या चाळिशीत असताना लोक कसे चालतात त्यावरून त्यांचा मेंदू आणि शरीर किती म्हातारं झालं आहे, हे कळू शकतं. शास्त्रज्ञ यासंबंधी संशोधन करत आहेत. चालण्याच्या गतीची एक साधी चाचणी घेऊन शास्त्रज्ञ म्हातारे होत जाण्याची प्रक्रिया जाणून घेऊ शकतात. संथपणे चालणाऱ्या लोकांचं शरीर लवकर म्हातारं होतंच, त्यासोबत त्यांचा चेहरा वयस्कर दिसू लागतो आणि त्यांच्या मेंदूचा आकारही लहान असल्याचं संशोधनातून निष्पन्न झालं आहे. हे एक आश्चर्यकारक संशोधन असल्याचं शास्त्रज्ञांनी म्हटलं आहे.**



**साधारणपणे** वयाच्या पासष्टीनंतर सर्वांगीण आरोग्य तपासण्यासाठी डॉक्टर चालण्याची गती तपासत असतात. कारण चालण्यातून स्नायूंची बळकटी, फुफ्फुसाची कार्यक्षमता, संतुलन, मणक्याची मजबुती तसंच दृष्टी या सर्वांबद्दलच योग्य अंदाज येतो. वृद्धत्वाकडे झुकलेले असताना संथपणे चालणाऱ्या व्यक्तींना स्मृतिभ्रंश होण्याची शक्यताही जास्त असते.

**समस्येचे संकेतदर्शक**

न्यूझीलंडमध्ये याबाबत एक अभ्यास करण्यात आला. यामध्ये ७० च्या दशकात जन्मलेल्या म्हणजेच आता साधारणपणे ४५ वर्षे वय असलेल्या व्यक्तींच्या चालण्याची तपासणी करण्यात आली. अभ्यासात सहभागी झालेल्या व्यक्तींची शारीरिक क्षमता तसंच मेंदूची कार्यक्षमताही बारकाईने तपासण्यात आली होती. लहानपणापासून या व्यक्तींची दोन वर्षांतून एकदा आकलन आणि बुद्ध्यांक चाचणीही करण्यात आली होती. संथ चाल हे म्हातारपणी येऊ शकणाऱ्या समस्यांचे संकेत जवळपास दहा वर्षे आधीच देत असल्याचं अभ्यासातून दिसून आलं, अशी माहिती प्रा. टेरी ई. मॉफिट यांनी दिली. मॉफिट हे लंडनच्या किंग्ज कॉलेज ऑफ लंडन तसंच अमेरिकेतल्या ड्यूक युनिव्हर्सिटीतील प्रमुख लेखक आहेत. ४५ वर्षे वयात चालण्याच्या वेगात बराच फरक पाहायला मिळतो. न धावता जास्तीत जास्त ४ मीटर/सेकंद इतक्या वेगाने चालता येऊ शकतं. संथपणे चालणाऱ्या व्यक्तींमध्ये वय वेगानं वाढण्यासोबतच फुफ्फुस, दातांच्या समस्या आणि क्षीण रोगप्रतिकारकशक्ती ही लक्षणं वेगानं चालणाऱ्या व्यक्तींच्या तुलनेत अधिक दिसून आली. सर्वात अनपेक्षित गोष्ट म्हणजे, मेंदूचं बारकाईने निरीक्षण केलं असता संथ चाल असलेल्या व्यक्तींचा मेंदू जास्त वयाचा दिसत असल्याचं संशोधनात आढळलं. मुलं तीन वर्षांची असल्यापासूनच बुद्धिमत्ता, भाषा आणि मुलांच्या हालचाली तसंच वाढीची क्षमता यांची चाचणी घेतल्यास वयाच्या ४५ व्या वर्षी त्याची चाल कशी असेल याचा अंदाज लावता येऊ शकतो, असं संशोधनात सिद्ध झालं आहे. संथ चालीसह मोठे होणाऱ्या मुलांचा (१.२ मीटर/सेकंद) बुद्ध्यांक वेगवान चाल असणाऱ्या मुलांच्या (१.७ मीटर/सेकंद) बुद्ध्यांकापेक्षा १२ गुणांनी कमी असल्याचं ४० वर्षांनंतर आढळून येतं.

**जीवनशैलीशी संबंध**

■ संशोधकांच्या आंतरराष्ट्रीय समूहाने जामा नेटवर्क ओपनमध्ये याविषयी लिहिलं आहे. आरोग्य आणि बुद्ध्यांक यामधला फरक आपल्या जीवनशैलीशी संबंधित असू शकतो किंवा अगदी सुरुवातीला असलेलं उत्तम आरोग्य या बाबींशी संबंधित असू शकतं, असा यामध्ये उल्लेख आहे. ■ आपल्याला उत्तम आरोग्य लाभणार की नाही याचे संकेत हे खूप आधीपासूनच मिळत असल्याचं संशोधक स्पष्ट करतात. ■ तरुण वयातील चालण्याचा वेग मोजणं हा आपलं म्हातारपण तपासण्यासाठीचा एक मार्ग असू शकतो, असं संशोधकांनी सांगितलं आहे. ■ हलकं जेवण घेण्यापासून ते मेटमॉर्फिन औषधापर्यंत विविध उपचारांचा शोध सध्या घेतला जात आहे. ■ आपल्या आरोग्याबाबत मेंदू आणि शरीराचे काही संकेत असतात. तरुण आणि निरोगी राहण्यासाठी आपल्या जीवनशैलीत बदल केल्यास उत्तम आयुष्य जगता येऊ शकतं, असं शास्त्रज्ञांनी स्पष्ट केलं आहे.

# आजमावून पाहा जास्वंदीचा चहा

**जास्वंदीच्या** फुलाचे महत्त्व आपल्याकडे मोठे आहे. गणपती बाप्पाचे हे फूल आवडते आहेच, पण त्याशिवाय हे फूल उत्तम औषधी म्हणूनही वापरले जात असते. जास्वंदीची फुले आणि पाने खोबरेल तेलामध्ये कढवून हे तेल केसांना लावल्याने अकाली पांढरे झालेले केस पुनश्च काळे होतात, तसेच केसगळती थांबून केसांची चांगली वाढ होते. जास्वंदीची फुले वापरून बनवलेला चहा किंवा काढा देखील आरोग्याच्या दृष्टीने अतिशय उत्तम समजला जातो. जास्वंदीची फुले भारतामध्ये बहुतेक ठिकाणी सहज उपलब्ध असून, हा चहामध्ये अनेक पौष्टिक तत्त्वे असून, यामध्ये कॅफीनचे प्रमाण नगण्य असते. या चहाच्या सेवनामुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहून कोलेस्टेरॉलचे प्रमाणही नियंत्रणात राहते. या चहाने शरीराची रोगप्रतिकारशक्ती वाढत असून, चयापचय शक्तीदेखील सुधारते.

'हिबिस्कस टी' किंवा जास्वंदीचा चहा बनवण्यासाठी जास्वंदीच्या फुलांचा वापर केला जात असून, या चहाला फुलांप्रमाणेच लाल रंग येतो. या चहाची चव काहीशी आंबटसर असून, हा चहा गरम किंवा गार पिता येतो. या चहामध्ये अँटी ऑक्सिडंट्स आणि 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणावर आहे. या चहामध्ये लोहाची मात्रा ही मुबलक असून कॅफीनचे प्रमाण अतिशय कमी असल्याने फिटनेस शौकिनांसाठी या चहाचे सेवन लाभदायक ठरते. यामध्ये पोटॅशियम आणि 'अ' जीवनसत्त्वही आहे. या कारणास्तव या चहाचे सेवन दररोज करणे चांगले. अनेक देशांमध्ये आता या जास्वंदीचा चहा ग्रीन टीला पर्याय म्हणून सेवन केला जात आहे.हा चहा बनवण्यासाठी खास जास्वंदीच्या चहाच्या टी बॅग्ज बाजारामध्ये मिळतात, त्यांचा वापर केला जाऊ शकतो. त्याशिवाय हा चहा घरी तयार करण्यासाठी दोन कप ताजी जास्वंदीची फुले किंवा अर्धा कप वाळवलेल्या जास्वंदीच्या फुलांची पावडर, आठ कप पाणी, पाव कप मध, तीन मोठे चमचे लिंबाचा रस इतक्या साहित्याची गरज आहे. जर चहा बनवण्यासाठी ताजी फुले वापरली जाणार असतील, तर या फुलांमधील तुरा काढून टाकावा.



त्यांतर ही फुले धुवून घेऊन आठ कप पाण्यामध्ये घालून हे पाणी उकळावे. पाण्याला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून पाण्याच्या भांड्यावर झाकण ठेवावे. हे झाकण पंधरा मिनिटे राहू द्यावे. त्यानंतर या पाण्यामध्ये लिंबाचा रस आणि मध घालून चांगले मिसळावे आणि मग हा चहा गाळून घ्यावा. हा चहा गरम किंवा थंड करून पिण्यास द्यावा. या चहाचे सेवन गर्भवती महिला, कर्करोगाचे उपचार घेणारे रुग्ण, कमी रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींनी कमी प्रमाणात करावे.


**उन्हाळा म्हणजे रखरखती ऊन, उष्णतेमुळे अंगाची झालेली काहिली आणि घशाला पडलेला शोष हे जणू समीकरणचं झालं आहे. असं असलं तरीदेखील हाच असा एकमेव ऋतू आहे, ज्यामध्ये आपण वेगवेगळ्या फॅशन ट्राय करू शकतो. त्यामुळे सध्याच्या काळात उन्हाळा म्हणजे फॅशनच्या दृष्टीने खरा ऋतू.**

# या फॅशनमुळे उन्हाळ्यात मिळेल 'कूल' फील

**उन्हाळ्याचे** दिवस अगदी प्रत्येकालाच नकोसे वाटत असतात. त्याच भरदुपारी उन्हामध्ये जर कामानिमित्त बाहेर जायचं असेल तर मग विचारायलाच नको. टळटळीत उन्हामध्ये घराबाहेर जाणं शक्यतो सारेच जण टाळत असतात. उन्हामुळे सतत येणारा घाम आणि त्यामुळे येणारा चिकचिकाट प्रत्येकालाच असह्य करत असतो. त्यामुळे या दिवसांत शक्यतो सारेच जण आरामदायी कपडे आणि फॅशन करण्याचा प्रयत्न करत असतात. विशेष म्हणजे या हॉट दिवसांमध्ये कूल राहण्याचे काही पर्याय आहेत. त्यामुळे उन्हाळ्याचा लूक कम्फर्टेबल पण स्टायलिश कसा असावा हे सुचवणाऱ्या काही टिप्स..

**हाय हिल्स**

उन्हाळ्यामध्ये कुल लूक हवा असेल तर हाय हिल्स हा सर्वोत्तम पर्याय आहे. दैनंदिन जीवनामध्ये आपण सॅण्डल, चप्पल यांचा वापर करत असतो. मात्र या स्टाइलला कंटाळला असाल तर हाय हिल्स हा उत्तम पर्याय आहे. परंतु या हिल्स वापरताना विशेष काळजी घ्यावी लागते.



**बॉडी फिटेड ड्रेसेस**

अनेक वेळा उन्हाळ्यामध्ये आपण फिकट रंगाचे किंवा सैलसर कपड्यांची निवड करतो. मात्र या उन्हाळ्यात कूल दिसायचं असेल तर बॉडी फिटेड ड्रेसेस नक्की ट्राय करून बघा. जर तुमचा बांधा सडपातळ असेल तर बॉडी फिटेड ड्रेसेस हा उत्तम पर्याय आहे. या ड्रेसमध्ये तुमचं सौंदर्य खुलून येत. त्यासोबतच यातदेखील फिकट रंग किंवा कॉटनचा पर्याय उपलब्ध असतो. त्यामुळे उन्हाळ्यात होणाऱ्या समस्या यामध्ये निर्माण होणार नाहीत. बॉडी फिटेड ड्रेसमध्ये स्कर्ट, शर्ट आणि ट्युनिक हे पर्याय उपलब्ध आहेत.



**मेश टॉप**

**मेश हा टॉप्सचा आधुनिक प्रकार आहे. पारदर्शक असणारे अशा प्रकारचे टॉप्स सध्या महाविद्यालयीन तरुणींना भुरळ घालत आहेत. या टॉपमध्ये रंगीबेरंगी स्पेगेडी (गंजी) घालणे मुली पसंत करतात. पांढऱ्या रंगाच्या टॉपमध्ये काळा किंवा कोणत्याही गडद रंगाची स्पेगेडी, पांढऱ्या टॉपमध्ये काळी स्पेगेडी असे विविध रंगाचे प्रयोग यामध्ये करू शकतो.**



**बुफांट हेअरस्टाइल**

उन्हाळ्यामध्ये मानेवर घाम येत असल्यामुळे आपण केस वर बांधतो. सतत केस बांधून राहिल्यामुळे केसांमध्ये घाम येतो. सोबतच केसांमध्ये चिकचिकाट निर्माण होतो. या साऱ्यामुळे केसांना विशिष्ट प्रकारचा उग्र वास येतो. या साऱ्या कटकटीपासून सुटका करायची असेल तर बुफान्ट हेअरस्टाइल मस्त पर्याय आहे. ६० च्या दशकामध्ये ही हेअरस्टाइल प्रचंड फेमस होती. तिच हेअरस्टाइल आता नव्याने सुरू झाली आहे. या हेअरस्टाइलमध्ये केसांचा थोडासा उंचवटा करून ते बांधले जातात. या पद्धतीने केस बांधल्यानंतर ते एखाद्या मुकुटाप्रमाणे भासतात. विशेष म्हणजे या पद्धतीने केस बांधल्यामुळे डोक्यावर जास्त घाम येत नाही.

**वनपीस ड्रेसेस**

उन्हाळ्यामध्ये मुली सैल कपडे घालणे पसंत करतात. त्यामध्ये उत्तम पर्याय म्हणजे वनपीस ड्रेस. यामध्ये काही पूर्ण बाह्यांचे तर काही स्लिव्हलेस (बाह्य नसलेले) असे काही आकर्षक वनपीस सौम्य रंगामध्ये उपलब्ध आहेत.



# स्ट्रेस रिलीफ ते वेट लॉस... वाचा आईस्क्रीम खाण्याचे फायदे

उन्हाळा सुरु झाला असून उष्णतेत वाढ होत आहे. या उष्णतेपासून दिलासा मिळावा यासाठी थंड पेय, आईस्क्रीम खाल्ले जाते. आईस्क्रीम या दिवसातील उष्ण वातावरणात शरीराला थंड ठेवण्यास मदत करते. त्यामुळे आईस्क्रीम लहान मुलांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांच आवडीने खातात. पण तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल की, आईस्क्रीम खाल्ल्याने शरीराला बरेच फायदे होतात.

■ **वेट लॉससाठी उपयुक्त :** आईस्क्रीम खाल्ल्यामुळे वेट लॉस होण्यास मदत होते. आईस्क्रीममधील व्हिटॅमिन बी-2 आणि बी-12 मेटाबॉलिझम संतुलित ठेवतो आणि बी-12 वजन कमी करण्यास फायदेशीर आहे.

■ **थकव्यावर फायदेशीर :** स्ट्रेस, दगदग यामुळे थकवा जाणवत असेल तर आईस्क्रीम नक्की खायला हवी. शरीरातील थकवा दूर होण्यासाठी एक कप आईस्क्रीमचे सेवन करणे फायदेशीर आहे. दुधामध्ये प्रोटीन आणि कॅल्शियमचे घटक असल्यामुळे थकवा येत नाही.

■ **मजबूत हाडे :** आईस्क्रीम दुधापासून बनवण्यात येते. दुधामध्ये जास्त प्रमाणात कॅल्शियम असते. कॅल्शियमच्या सेवनामुळे हाडे मजबूत होतात. शरीरात उपस्थित 99 टक्के कॅल्शियम हे हाडांमध्येच असते. त्यामुळे दुधाची आईस्क्रीम खाल्ल्याने हाडांचे आजार दूर होण्यास मदत होते.

■ **स्किनसाठी उत्तम :** दुधापासून तयार करण्यात आलेल्या आईस्क्रीममध्ये प्रोटीन असते. प्रोटीनचे सेवन केल्याने स्नायू मजबूत होतात. तसेच यामुळे हाड, स्नायू, रक्त आणि त्वचेसाठी फायदेशीर असते.

■ **स्ट्रेसपासून मुक्तता :** आईस्क्रीम खाल्ल्याने मेंदूमध्ये डोपामाइन आणि सेरोटोनिनसारखे 'फील-गुड' हार्मोन्स मुक्त होतात, ज्यामुळे ताण कमी होतो. त्यामुळे आईस्क्रीमचा आनंद नक्की घ्यायला हवा.

**टीप : आईस्क्रीममध्ये साखर आणि कॅलरी जास्त असतात, त्यामुळे त्याचे अतिसेवन करणे टाळावे. मधुमेही किंवा वजन वाढीचा त्रास असलेल्यांनी तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच आईस्क्रीम खावे.**



# माठातील पाणी अमृतापेक्षा कमी नाही

उन्हाळ्यात तहान लागली की थंड पाणी पिण्याची इच्छा होते. अनेक जण फ्रिजमधील थंड पाणी पितात, पण ते आरोग्यासाठी घातक असते. तज्ञ सांगतात की, फ्रिजमधील पाणी पिल्याने घशाचे त्रास वाढतात आणि पोटाच्या समस्या होण्याचीही शक्यता असते. त्यामुळे उन्हाळ्यात माठातील पाणी पिणे चांगले ठरते. हे पाणी आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरते. तसेच माठातील पाणी नैसर्गिकरित्या थंड राहते. आयुवेर्दात याला अमृतासमान मानले जाते.

**माठातील पाणी थंड कसे राहते?**

माठातील पाणी बाष्पीभवन प्रक्रियेमुळे नैसर्गिकरित्या थंड राहते. मातीच्या भांड्याला असणाऱ्या हजारो सूक्ष्म छिद्रांतून पाणी पाझरते आणि बाहेरच्या उष्णतेमुळे त्याचे बाष्पीभवन होते, ज्यामुळे माठातील पाणी गार राहते. त्यामुळे माठ नेहमी खिडकीजवळ किंवा हवा खेळती असलेल्या ठिकाणी ठेवावा, जेणेकरून बाष्पीभवन जलद होऊन पाणी जास्त थंड होते.

**माठातील पाणी पिण्याचे फायदे**

● आजकाल डॉक्टरसुद्धा फ्रिजमधील पाण्यापेक्षा माठातील पाणी पिण्याची शिफारस करतात. कारण हे पाणी नैसगिर्करित्या थंड झालेले असते. ● आरोग्य तज्ञांच्या मते, हे पाणी घशासाठी आणि आतड्यांसाठी फायदेशीर असते. एखादा आजारी माणूसही हे पाणी पिऊ शकतो. ● माठातील पाणी पचनास हलके असते. यामुळे चयापचय क्रिया चांगली राहते आणि ॲसिडिटीची समस्या कमी होते. ज्यांना पोटाच्या समस्यांचा त्रास होतो, त्यांच्यासाठी माठातून पाणी पिणे हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो. ● मातीतील नैसर्गिक खनिजे जसे की, कॅल्शियम, मॅग्नेशियम) पाण्यात मिसळतात, ज्यामुळे पाण्याचे पोषणमूल्य वाढते. ● माठ पाणी शुद्ध करण्यासाठी नैसर्गिक फिल्टर म्हणून काम करतो आणि पाण्याची पीएच पातळी संतुलित ठेवतो. यामुळे शरीरात साचलेले विषारी पदार्थ बाहेर पडतात आणि रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. माठातील पाणी हे एक नैसर्गिक डिटॉक्स वॉटर म्हणून काम करते. ● फ्रिजमधील पाणी खूप थंड असल्यामुळे घशातील रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे वारंवार घशाचे त्रास होतात. याउलट माठातील पाणी पिणे शरीरासाठी फायदेशीर मानले जाते. ते प्यायल्याने घशाचे संरक्षण होते, सर्दी आणि तापापासून आराम मिळतो.



# वाढत्या उन्हाने नागरिक हैराण...
## पुढील आठवड्यात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता

**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

ठाणे शहरात उष्णतेचा पारा ४० अंशांच्या उंबरठ्यावर पोहोचला असून वाढत्या उन्हाच्या झळांनी नागरिकांची अक्षरशः अंगाची लाहीलाही होत आहे. पुढील आठवड्यात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

यंदाच्या उन्हाळ्यात मार्च महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात शहरात उष्णतेचा तडाखा वाढल्याचे दिसून आले होते. त्या काळात तापमानाने तब्बल ४० अंश सेल्सिअसचा टप्पा गाठला होता. त्यामुळे दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे ठाणेकरांसाठी त्रासदायक ठरत होते. त्यानंतर राज्यातील काही भागांत झालेल्या अवकाळी पावसामुळे तापमानात घट होऊन पारा ३० ते ३२ अंशांपर्यंत खाली आला होता. त्यामुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला होता.

मात्र, मार्च अखेर होत असताना पुन्हा एकदा उन्हाची तीव्रता वाढताना दिसत आहे. गेल्या तीन ते चार दिवसांत तापमान ३५ ते ३९ अंशांदरम्यान नोंदवले गेले असून शुक्रवारी दुपारी ते ३९ अंशांवर पोहोचले. दुपारच्या वेळेत बाहेर पडताना नागरिकांना प्रखर उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत.

तज्ज्ञांच्या मते, ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीच्या तापमानात सातत्याने वाढ होत असून त्याचा परिणाम शहरांतील उष्णतेवरही होत आहे. वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होणे, चक्कर येणे, अशक्तपणा तसेच श्वसनाच्या तक्रारी वाढण्याची शक्यता असते.

प्रखर सूर्यकिरणांमुळे डोळ्यांवरही परिणाम होऊन काही वेळा अंधारी येणे किंवा भिरभिरल्यासारखे वाटणे अशी लक्षणे दिसू शकतात. येत्या काही दिवसांत तापमानात आणखी वाढ होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असून यंदाचा उन्हाळा ठाणेकरांसाठी अधिक तापदायक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# ठाण्याचा पारा ४० अंशांच्या उंबरठ्यावर
## काही ठिकाणी 'कृत्रिम सावली'चा दिलासा



ठाणे शहरात वाढत्या तापमानामुळे नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेऊन ठाणे महानगरपालिकेने 'कृत्रिम सावली'चा उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. शहरातील महत्त्वाच्या चौकांतील सिग्नलवर शेड उभारून वाहनचालक आणि पादचाऱ्यांना उन्हापासून संरक्षण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. दुपारच्या कडक उन्हात सिग्नलवर थांबताना नागरिकांना प्रखर सूर्यकिरणांचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. विशेषतः दुचाकीस्वार, रिक्षाचालक तसेच पादचारी यांना या उष्णतेचा अधिक फटका बसत होता. ही बाब लक्षात घेऊन ठाणे महापालिकेने हा उपक्रम हाती घेतला असून सिग्नलवर उभारण्यात येणाऱ्या शेडमुळे नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. शहरातील प्रमुख आणि वर्दळीच्या चौकांमध्ये टप्प्याटप्प्याने हे शेड उभारले जाणार असून, उन्हाळ्याच्या तीव्रतेतही नागरिकांना 'कृत्रिम सावली'चा लाभ मिळणार आहे. या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत असून वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या या निर्णयाचे कौतुक केले जात आहे. उन्हाच्या वाढत्या झळांपासून नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाकडून अशा प्रकारच्या उपाययोजना राबवणे गरजेचे असून, ठाणे महापालिकेचा हा उपक्रम त्यादृष्टीने एक सकारात्मक पाऊल मानला जात आहे.

# ठाणे जिल्ह्यात प्रति कुटुंब ३ लिटर रॉकेल
## ग्रामीण भागासाठी रॉकेलचा कोटा मंजूर



"ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात पिवळे शिधापत्रिका धारक ४८,७९५, केशरी १,१६,१४५ आणि पांढरे ४१,३१० असे एकूण २,०६, २५० शिधापत्रिका धारक असून, या सर्वांना रॉकेलचे वाटप करण्यात येणार आहे. या साठ्याच्या वाहतुकीसाठी जिल्ह्यात ४ टँकरना परवानगी देण्यात आली आहे. साठा प्राप्त होताच तत्काळ केरोसीनचे वाटप सुरू करण्यात येईल."
**-सर्जेराव म्हस्के-पाटील, जिल्हा पुरवठा अधिकारी, ठाणे**

**■ठाणे। प्रतिनिधी,**

आखाती देशांतील वाढत्या युद्ध परिस्थितीची धग आता स्वयंपाकघरापर्यंत पोहोचू लागली असून, इंधन टंचाईचे संकट निर्माण झाले आहे. राज्यातील विविध जिल्हे आणि शहरांमध्ये इंधन टंचाईचे आव्हान उभे ठाकले आहे. या पार्श्वभूमीवर हॉटेल उद्योगासाठी लागणारे व्यावसायिक गॅस सिलिंडर आणि घरगुती गॅस सिलिंडर यांचा प्राधान्यक्रम ठरवून वितरण केले जात आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील वाढत्या तणावामुळे खनिज तेल आणि गॅस वाहतुकीवर परिणाम झाला आहे. याचा फटका भारतालाही बसत असून, देशातील अनेक राज्यांमध्ये गॅस पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. मात्र, ठाणे जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात घरगुती गॅस सिलिंडरचा पुरेसा साठा उपलब्ध असून, नागरिकांनी घाबरण्याचे कारण नसल्याचे आवाहन शिधावाटप विभागाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, हॉटेल्समध्ये वापरले जाणारे व्यावसायिक गॅस सिलिंडर काही दिवसांपासून बंद ठेवण्यात आल्याने हॉटेल व्यावसायिकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

**...तरच रॉकेल मिळणार**

दरम्यान, एलपीजीला तात्पुरता पर्याय म्हणून शासनाने रॉकेल (घासलेट) वाटप करण्याचा निर्णय घेतला असून, ठाणे जिल्ह्यासाठी प्रति कुटुंब ३ लिटर रॉकेलचा कोटा निश्चित करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील सर्व शिधापत्रिकाधारकांना मिळणार आहे. तसेच ज्या कुटुंबांकडे शिधापत्रिका कार्ड नाही, अशा कुटुंबांना गावकरी असल्याचा पुरावा सादर केल्यानंतरच रॉकेल देण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**ठाणे जिल्ह्यासाठी ४८ हजार किलो लिटर राखीव**

केंद्र सरकारच्या १२ मार्च २०२६ रोजीच्या आदेशानुसार एलपीजीला पर्याय म्हणून रॉकेल वाटपाचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर (३,७४४ किलो लिटर) रॉकेल साठा मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी ४८ हजार लिटर (४८ किलो लिटर) साठा ठाणे जिल्ह्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या साठ्याच्या वाहतुकीसाठी जिल्ह्यात ४ टँकरना परवानगी देण्यात आली असून, मार्च आणि एप्रिल या कालावधीत तालुकानिहाय मागणीनुसार रॉकेलचे वितरण करण्यात येणार आहे. रॉकेलच्या विक्री दराबाबतचे स्वतंत्र आदेश शासन स्तरावरून लवकरच जाहीर होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली.

# शास्ती माफ योजनेस ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
## पालिकेच्या तिजोरीत एका दिवसात १३.५० कोटींची भर

**■ठाणे। प्रतिनिधी,**

महापालिकेने थकीत मालमत्ता कर तसेच चालू वर्षाचा कर भरणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी दंडावर ९० टक्के सूट देण्याची विशेष योजना जाहीर केली होती. या योजनेनुसार, करदात्यांनी मूळ करासोबत केवळ १० टक्के दंड भरल्यास उर्वरित ९० टक्के शास्ती माफ करण्यात येत आहे. या योजनेला ठाणेकरांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, निवासी करदात्यांसाठी लागू करण्यात आलेल्या या दंडमाफी योजनेला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, २५ मार्च या मुदतवाढीपूर्वीच्या शेवटच्या दिवशीच मालमत्ता कर विभागाने तब्बल १३.५० कोटी रुपयांची वसुली करण्यात यश मिळवले आहे.

महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी महासभेत दिलेल्या निदेर्शानुसार, २५ मार्चला संपणारी ही योजना ३१ मार्चपर्यंत सुरू ठेवण्यात आली आहे. सुरुवातीला ही सवलत योजना १२ मार्च ते २५ मार्च या कालावधीत लागू करण्यात आली होती. या कालावधीत पालिकेच्या तिजोरीत एकूण ५७ कोटी रुपयांची भर पडली, तर केवळ २५ मार्च या एका दिवसातच १३.५० कोटींची वसुली झाली. ठाणे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाला यंदा ९२० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. जानेवारी अखेरपर्यंत ५६५ कोटी रुपये जमा झाले होते, तर फेब्रुवारी अखेर ही रक्कम ६३० कोटींवर पोहोचली होती. सवलत योजना लागू झाल्यानंतर वसुलीत आणखी वाढ होऊन २५ मार्च अखेर एकूण ७६० कोटी रुपये पालिकेच्या तिजोरीत जमा झाल्याची माहिती प्रशासनाने दिली.



**सुट्टीच्या दिवशी करवसुली केंद्र सुरू**

अद्याप कर न भरलेल्या मालमत्ताधारकांनी संभाव्य कारवाई टाळण्यासाठी तत्काळ कर भरावा, असे आवाहन करण्यात आले आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कर भरण्यासाठी महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच, फेब्रुवारी व मार्च महिन्यातील सर्व शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.३० या वेळेत, तसेच रविवारी सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत करवसुली केंद्रे व मुख्य कार्यालय सुरु ठेवण्यात येणार असल्याचेही महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

# राज्यात ८ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य शासनाने प्रशासकीय स्तरावर मोठे फेरबदल केले असून, राज्यातील ८ वरिष्ठ सनदी (आयएएस) अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. या बदल्यांमुळे मुंबई महापालिका, मुंबई मेट्रो, कोकण आणि अमरावती विभाग तसेच सांगली जिल्ह्याला नवे प्रशासकीय नेतृत्व मिळाले आहे. मुंबई मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक रुबल अग्रवाल यांची कोकण विभागीय आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांची आता महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालकपदी बदली झाली आहे. महिला व बाल विकास विभागाच्या आयुक्त नयना गुंडे यांची अमरावतीच्या नव्या विभागीय आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे यांची मुंबईतील महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या (एमएआयडीसी) व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती झाली आहे. सांगलीच्या जिल्हाधिकारी पदाची जबाबदारी आता डॉ. मैनाक घोष यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. डॉ. घोष हे मूळचे पश्चिम बंगालचे असून २०१९ च्या बॅचचे अधिकारी आहेत. संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून ओळखले जाणारे डॉ. घोष यापूर्वी धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या जागी प्रियमवदा म्हाडदळकर यांची धाराशिव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मूळच्या रत्नागिरीच्या असलेल्या प्रियमवदा या २०२२ च्या बॅचच्या अधिकारी असून त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत महाराष्ट्रातून १३ वा क्रमांक पटकावला होता. याचबरोबर, एम. देवेंद्र सिंग यांची मुंबई महापालिकेत सहआयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून राहुल रेखावार यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सदस्य सचिव पदी वर्णी लागली आहे.

# राणीच्या बागेत लवकरच पर्यटकांसाठी वाहनांमधून सैर
## 50 ते 20 रुपये शुल्क

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईकरांसह परदेशी पर्यटकांना आवडीचे पर्यटनस्थळ असलेल्या भायखळा येथील राणीच्या बागेत (वीरमाता जिजाबाई भोसले उद्यान आणि प्राणिसंग्रहालय) लवकरच बॅटरीवर चालणाऱ्या वाहनांमध्ये बसून (आठ आसन क्षमता) प्राणिसंग्रहालयात सैरसपाटा करता येणार आहे. त्यासाठी आवश्यक वाहनांचा पुरवठा अगोदरच करण्यात आलेला आहे. मात्र एखादी बाह्य संस्था उपलब्ध झाल्यास त्यांच्यामार्फत पर्यटकांना सदर वाहनात बसून प्राणिसंग्रहालयात सैरसपाटा करता येणार आहे. मात्र त्यासाठी मुंबईकर देशी पर्यटकांना प्रौढ व्यक्तीला 100 रुपये, 12 वर्षांखालील मुलांना 50 रुपये, ज्येष्ठ नागरिकांना 50 रुपये तर विदेशी प्रौढ पर्यटकांना 200 रुपये आणि 12 वर्षांखालील विदेशी मुलांना 100 रुपये शुल्क आकारले जाणार आहेत. मात्र दिव्यांग व्यक्तींना वाहन सुविधा मोफत असणार आहे.

# सेमीफायनलच्या तिकिटांची 25 हजारांना विक्री... माजी अंडर-19 क्रिकेटपटू आणि क्रिकेट प्रशिक्षक कार्यरत असलेला अटकेत

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या अंडर-19 संघाचा माजी खेळाडू आणि सध्या क्रिकेट प्रशिक्षक म्हणून कार्यरत असलेला 26 वर्षीय बलवंत सिंह स्वरूप सिंह सोधा याला तिकिटांच्या काळाबाजार प्रकरणी अटक करण्यात आली आहे. डी.बी. मार्ग पोलिसांनी त्याला आयसीसी पुरुष टी-20 वर्ल्ड कप अंतर्गत 5 मार्च रोजी वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सेमीफायनल सामन्याची तिकिटे चढ्या दराने विकल्याच्या आरोपाखाली ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मालाडचा रहिवासी असून तो क्रिकेट कोचिंगशी संबंधित आहे. त्याच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम 318 अन्वये फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. टी-20 वर्ल्ड कप दरम्यान तिकिटांची अवैध विक्री आणि काळाबाजार केल्याप्रकरणी आतापर्यंत सहा जणांना अटक झाली आहे.

तपासादरम्यान या रॅकेटचे धागेदोरे शिक्षण आणि क्रीडा प्रशासनाशी जोडले गेल्याचे संकेत मिळाले आहेत. अंधेरीतील एका नामवंत कॉलेजचा स्पोर्ट्स टीचर या प्रकरणाचा मुख्य आरोपी असल्याचे सांगितले जात आहे. तो मुंबई क्रिकेट असोसिएशनचा सदस्य देखील आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्याला मिळालेली 'कॉम्प्लिमेंट्री' आणि 'पेड' तिकिटे त्याने दलालांकडे सोपवली होती. हीच तिकिटे नंतर बाजारात अनेक पटींनी जास्त किमतीत विकली गेली.

अटक करण्यात आलेल्या सोधाच्या पार्श्वभूमीची चौकशी केली असता, तो 2019 पर्यंत मुंबईच्या अंडर-19 संघासाठी तो खेळत होता, एक उदयोन्मुख खेळाडू मानला जात होता. कालांतराने त्याने सक्रिय क्रिकेट सोडून कोचिंग सुरू केले. पोलीस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्याने अशा अनेक खेळाडूंसोबत क्रिकेट खेळले आहे, जे आज मोठ्या स्तरावर खेळत आहेत आणि याच संपर्काचा वापर करून तो या रॅकेटमध्ये सामील झाला.

**...असा झाला तिकिटांच्या काळाबाजाराचा भांडाफोड**

या रॅकेटचा खुलासा मार्चच्या सुरुवातीला झाला होता, जेव्हा डी.बी. मार्ग पोलिसांनी सर्वप्रथम माटुंगा येथील एका कॉलेजच्या शिपायाला संशयास्पद हालचालींमुळे ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून अंधेरीतील कॉलेजच्या स्पोर्ट्स टीचरचे नाव समोर आले आणि त्यानंतर एकामागून एक धक्कादायक माहिती समोर येत गेली. आरोपी सोशल मीडियाच्या माध्यमातून तिकिटे विकण्याच्या जाहिराती देत असत आणि एक तिकीट 20 ते 25 हजार रुपयांना विकले जात होते. हे नेटवर्क खूप मोठे असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली असून आगामी काळात या प्रकरणात आणखी काही अटकेची शक्यता आहे.

# हत्येसारख्या गंभीर गुन्ह्याच्या तपासात तरी गांभीर्य बाळगा! न्यायालयाचे सरकारी पक्ष, पोलिसांवर ताशेरे

**■मुंबई। प्रतिनिधी,**

हत्येसारख्या गंभीर गुन्ह्याच्या तपासातही गांभीर्य न दाखवणाऱ्या पोलीस आणि सरकारी पक्षावर सत्र न्यायालयाने कडक ताशेरे ओढत गेल्या पाच वर्षांपासून हत्येचा खटल्यात तुरुंगात असलेल्या आरोपीला जामीन मंजूर केला. वाकोला येथे २१ जून २०१९ रोजी सुरेश हळदे या व्यक्तीची हत्या झाली होती. या प्रकरणी वाकोला पोलिसांनी आरोपी संदीप चौरसियाविरोधात गुन्हा नोंद केला होता. वाकोला पोलिसांनी तपास करून सप्टेंबर २०१९ मध्ये वांद्रे न्यायालयात आरोप पत्र सादर केले. त्यानंतर हे प्रकरण मुंबई सत्र न्यायालय ३० वे न्यायालय यांच्याकडे सुनावणीसाठी वर्ग केले होते. २०१९ पासून चौरासिया आर्थर रोड तुरुंगात कैद आहे. त्याने ॲड. मंगेश सौंदाळकर यांच्यामार्फत जामिनासाठी सत्र न्यायालयात दाद मागितली होती. आरोपीतर्फे बाजू मांडताना ॲड. मंगेश सौंदाळकर यांनी पोलीस तपासातील विविध त्रुटी निदर्शनाला आणल्या. ॲड. सौंदाळकर यांनी कागदपत्रांची बारकाईने तपासणी केली. यावेळी त्यांना आरोपपत्रात शवविच्छेदन अहवाल पोलिसांनी जोडला नसल्याचे लक्षात आले. त्यानंतर माहितीच्या आधाराखाली शवविच्छेदन अहवाल पत्राची मागणी केली. याचदरम्यान न्यायालयात स्वतंत्र अर्जही केला. त्यानंतर पोलिसांनी शवविच्छेदन अहवाल सादर केला. तो अहवाल जामीन अर्जाच्या सुनावणीत महत्त्वपूर्ण ठरला.



**तपासात अनेक त्रुटी**

पोलिसांनी खटल्याच्या सुरुवातीला शवविच्छेदन अहवाल न्यायालयात सादर केला नाही. किंबहुना, गुन्ह्यात वापरलेला मुद्देमाल पोलीस ठाण्यातून गहाळ झाला व नंतर तो मिळाल्याचे दाखवण्यात आले. तसेच अद्याप महत्त्वाच्या साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आलेली नाही. त्यामुळे खटला गेली पाच वर्षे रेंगाळला.

# युगांडाच्या महिलांची हालचाल संशयास्पद वाटली, पोलिसांनी सापळा रचताच धक्कादायक प्रकार उघडकीस

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या वाकोला परिसरात पोलीस आणि दहशतवादविरोधी कक्षाच्या संयुक्त पथकाने एका धाडसी कारवाईत दोन परदेशी महिलांना ताब्यात घेतले आहे. या दोन्ही महिला मूळच्या युगांडा देशाच्या नागरिक असून त्या गेल्या अनेक वर्षांपासून कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय भारतात वास्तव्य करत असल्याचे तपासात समोर आले आहे. गुप्तचर विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, या महिलांची हालचाल संशयास्पद वाटल्याने पोलिसांनी वाकोला परिसरात सापळा रचला आणि एका विशेष मोहिमेद्वारे त्यांना अटक केली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून परदेशी नागरिकांच्या अवैध वास्तव्याचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी या महिलांची कसून चौकशी सुरू केली असून त्यांच्या स्थानिक संपर्कांचाही शोध घेतला जात आहे.

**विनापरवाना वास्तव्य आणि पोलिसांचा छापा**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ताब्यात घेण्यात आलेल्या महिलांची नावे नकायोंडो रोज (वय ३७) आणि केमिगिसा प्रोसकोविया (वय २६) अशी आहेत. या दोघीही गेल्या काही काळापासून मुंबईतील कलिना परिसरात भाड्याच्या खोलीत राहत होत्या. वाकोला पोलीस आणि एटीसीच्या पथकाला त्यांच्याबद्दल खात्रीशीर माहिती मिळाल्यावर त्यांनी एका विशिष्ट नियोजनानुसार ही छापेमारी केली. तपासादरम्यान असे दिसून आले की, या महिलांकडे भारतात राहण्यासाठी आवश्यक असलेला वैध व्हिसा किंवा इतर कोणतेही कायदेशीर दस्तऐवज उपलब्ध नव्हते. त्यांचा अधिकृत व्हिसा कालावधी संपल्यानंतरही त्या छुप्या पद्धतीने या ठिकाणी राहत असल्याचे स्पष्ट झाले असून, यामुळे विदेशी नागरिक कायद्याचे सरळ उल्लंघन झाले आहे. या महिला इतका काळ प्रशासनाच्या नजरेतून कशा वाचल्या, हा आता तपासाचा मुख्य विषय बनला आहे.

**डिपोर्टेशनची प्रक्रिया आणि पुढील कायदेशीर कारवाई**

या महिलांना ताब्यात घेतल्यानंतर त्यांची सखोल चौकशी करण्यात आली, ज्यामध्ये त्यांनी आपला व्हिसा संपल्याची कबुली दिली आहे. त्या नेमक्या कोणत्या उद्देशाने इतके दिवस भारतात राहत होत्या आणि या काळात त्या कोणत्या सामाजिक किंवा व्यावसायिक उपक्रमांमध्ये सहभागी होत्या, याचा शोध आता पोलीस घेत आहेत. मुंबईसारख्या संवेदनशील शहरात कोणत्याही वैध पुराव्याशिवाय परदेशी नागरिकांचे राहणे हे सुरक्षेच्या दृष्टीने आव्हानात्मक मानले जाते. त्यामुळेच, पोलिसांनी या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेऊन तातडीने कठोर पावले उचलली असून विदेशी नागरिक कायद्याच्या संबंधित कलमांखाली त्यांच्यावर गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे. या कारवाईमुळे अवैध मानवी तस्करी किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांशी त्यांचे काही संबंध आहेत का, याचीही पडताळणी केली जात आहे.

सध्या या दोन्ही महिलांच्या विरोधात डिपोर्टेशन म्हणजेच त्यांना त्यांच्या मायदेशी पाठवण्याची कायदेशीर प्रक्रिया पोलिसांनी सुरू केली आहे. यासाठी मुंबई पोलिसांनी युगांडा दूतावासाशी संपर्क साधला असून आवश्यक कागदोपत्री पूर्तता केली जात आहे. मुंबई पोलीस दलाने स्पष्ट केले आहे की, शहरात अवैधपणे राहणाऱ्या विदेशी नागरिकांविरुद्धची ही मोहीम यापुढेही अधिक तीव्र केली जाईल. गुप्तचर यंत्रणांच्या मदतीने अशा संशयास्पद व्यक्तींवर सतत पाळत ठेवली जात असून, देशाच्या सुरक्षेला बाधा पोहोचवणाऱ्या कोणत्याही अवैध हालचालींना थारा दिला जाणार नाही. वाकोला परिसरातील या कारवाईने नागरिकांमध्ये सतर्कतेचा संदेश दिला असून स्थानिक स्तरावर पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेचे कौतुक होत आहे.


# धक्कादायक! दोन पोलिसांनी किडनॅप करुन एकाला लुटले
## मुंबईच्या जुहूमध्ये धक्कादायक घटना उघडकीस

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईत रक्षकच भक्षक बनल्याची घटना घडली आहे. मुंबई पोलिसांवरील विश्वास उडवणारी धक्कादायक घटना मुंबईच्या जुहू परिसरात घडली आहे. दोन पोलिसांनी एका व्यक्तीला किडनॅप करुन क्राईम ब्रँचचे अधिकारी असल्याचं सांगून लुटल्याची घटना घडली आहे. किडनॅप करणाऱ्या दोन्ही पोलिसांना दहिसर परिसरात लोकांनी बेदम मारहाण केली आहे. जुहू पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून दोन पोलिसांना अटक केली आहे.

मुंबई

पोलिसांच्या प्रतिमा मलिन करणारी धक्कादायक घटना मुंबईचा जुहू परिसरात घडली आहे. मुंबई पोलिसांच्या दोन कर्मचाऱ्याकडून करन्सी करन्सी एक्सचेंज करणारी फोरेक्स कंपनीचा कामगाराला किडनॅप करून लुटण्याचे धक्कादायक घटना घडली आहे. फोरेक्स कंपनीचा ऑफिसमध्ये काम करणारा कामगार सुमित आंबेकर वय 30 वर्ष विलेपार्ले परिसरात 10 हजार अमेरिकन डॉलरची डिलिव्हरी करण्यासाठी जात असताना एका इमारतीमध्ये या दोन्ही पोलीस कर्मचाऱ्यांनी त्याला पकडून मारहाण करून एका कारमध्ये बसून किडनॅप केले.




यानंतर या दोन्ही पोलीस शिपायांनी किडनॅप करून त्या व्यक्तीला मी पोलीस आहे आणि पोलिसांच्या ओळखपत्र दाखवून दहिसर पूर्वेत हनुमान मंदिर शेजारी घेऊन गेले, त्या ठिकाणी त्याला मारहाण करून तुझा व्यवसाय चुकीचा आहे यामध्ये मोठ्या प्रमाणात चीटिंग केली जात आहे. त्यामुळं तुमच्या कंपनीच्या सर्व पेपर घेऊन दहिसर क्राइम ब्रांच ऑफिसमध्ये बोलवा, यानंतर फियार्दीने म्हटलं ठीक आहे. पोलीस स्टेशनला घेऊन चला मी सर्व पेपर मागवतो यानंतर थेट या पोलिसांनी मारहाण करायला सुरुवात केली.

रस्त्यावर पोलिसांनी फियार्दीला मारहाण करत असताना लोकांनी पाहिला यानंतर त्या ठिकाणी जमा झालेला जमावाने दोन्ही पोलिसांना बेदम मारहाण केली. मारहाण केल्यानंतर लोकांनी पोलीस कंट्रोल नंबर वर कॉल करून पोलीस स्टेशन मधून मदत मागवली. दहिसर पोलिसांनी यानंतर या दोन्ही पोलिसांना ताब्यात घेऊन पुढील कारवाई करण्यासाठी जुहू पोलिसांकडे पोहोचवले. जुहू पोलिसांनी या प्रकरणी दोन्ही पोलिसांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. अटक करण्यात आलेला पोलीस आरोपी संदीप शिंदे बीकेसी पोलीस स्टेशनमध्ये तैनात आहे. तर गजेंद्र राजपूत हा पोलीस शिपाई जोगेश्वरी पोलीस स्टेशनमध्ये तैनात आहे. खरंतर पोलिसांवर मुंबईकरांची रक्षा करण्यासाठी जबाबदारी असतात मात्र पोलीसच रॉबरी आणि किडनॅप करत असेल तर विश्वास कोणावर करायचं असा प्रश्न आता मुंबईकर उपस्थित करत आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००0१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com